संगीत संतापशमन अथवा
वासविलास नाटक

= लेखक =

केसकर, दत्तात्रय अनंत

आ० २ री; पुणे; सिताराम नारायण बापट; इंदिरा; पुणे;
१९०१; ६+९६; ७·२x४·४; ·111·

संगीत

संतापशमन नाटक.

अंक पहिला.

नांदी.

पद (' सांबसुराभरणा. ' या चालीवर.)

वंदन हरचरणा ॥ करितों ॥ संसृतिभयहरणा ॥ धृ० ॥ मंदाकिनिपवनें ॥ शिरींच्या ॥ बालचंद्रकिरणें ॥१॥ किन्नरगणगानें ॥ गौरी ॥ बाहुस्पर्शानें ॥ रोमांचित जी हरतनु झाली ॥ रक्षो ती सकलां सुजनां ॥ संसृति० ॥ २ ॥

पद (छायानट) त्रिवट.

स्तवित मि त्या घननील मुकुंदा ॥ देवकीनंदानंदमुकंदा ॥ धृ ०॥ सेवित कालिंदीसुपुलिंदा ॥ श्रीमुखकमलमरंदमिलिंदा ॥ सनक सनंदन गाती अनुदिन ॥ गोड तुझा महिमा गोविंदा ॥ १ ॥ कुंदरदन अरविंदमुखेंदा ॥ कैटभमुरचाणूरनिकंदा ॥ त्वत्स्तुति सकल निंदामय धंदा॥लागो दत्तात्रय तव छंदा॥२॥

सूत्रधार—[पुढें होऊन] पुरे, पुरे, समाजनांचा काल हरण व रसभंग करणारा वृथा परिश्रम कशाला पाहिजे. अरे वाः! वर्षाकाल लागतांच जसे राजहंस सहपरिवार मानस सरोवरीं जातात, तसे हे महा रसिकजन आज आमच्या गांधर्वशाळेंत जमले आहेत. वाहवा! काय हा आनंदाचा दिवस!! अरे हो! पण ही आमची संगीत शाळा आज अशी शून्य कां दिसते? कुशीलवादी मंडळी गेली तरी कोठें? तर आतां भार्येलाच हाक मारली पाहिजे. [पडद्याकडे पाहून] मारिषा, आंत जाऊन प्रियेला असें सांग कीं,

साकी.

रसिक महाजन अभिनव नाटक ॥ बघण्या उत्सुक असती ॥ कृष्णसारमृग-सम पंडितजन ॥ गानोत्सुक हे दिसती ॥ यास्तव हे चतुरे ॥ पात्रें नटवुनि आण बरें ॥ १ ॥

नटी—[प्रवेश करिते] प्राणनाथ काय आज्ञा आहे?

सूत्रधार—प्रिये, कथासरित्सागरांतील वत्सराजाच्या चरित्राचा आधार घेऊन माझ्या एका मित्रानें अभिनव नाटकाची रचना केली आहे. त्याचा प्रयोग आज या चंद्रिकोत्सवांत या समाजनांपुढें मी करून दाखविणार आहें.

नटी—प्राणनाथ, समजलें. सोमवंशांतलि अर्जुनापासून सातवा सार्वभौमराजा वत्सराज याचा कथाभाग असल्यावर अपयशाची चिंता आपल्याला मुळींच नको.

सूत्रधार—हें काय विचारावें प्रिये?

पद (यमनकल्याण) त्रिवट.

अभिनव मोहक नाटक असुनी ॥ रसिक सभा ही गुणग्राहिणी ॥धृ०॥ वत्सपतिकथा सकल जनांला ॥ ठाऊक आहे अतिशय विमला ॥ सर्व योग हे या समयाला ॥ मम दैवानें जाति मिळोनी ॥ १ ॥

नटी—प्राणनाथ, तें सर्व खरं. पण त्याच्या चरित्राचे कथाभाग पुष्कळ आहेत. त्यांपैकीं आपण कोणत्या चरित्राचा भाग इथें करून दाखविणार?

सूत्रधार—प्रिये ऐक.

पद (' अष्टमूर्ति ' या चालीवर.)

सोमवंशिचा अतुलप्रतापी वत्सराज नृपती ॥ धीर ललित विख्यातचि असतां विमल ज्याचि कीर्ती ॥ धृ ० ॥ विंध्यकेतुची सुता तयाला प्राप्त कशी झाली ॥ रम्य कथा ही दत्तात्रयकविपटुनें जी लिहिली करुणाप्रणित शृंगाराची शोभा ज्या आली ॥ ऐसें अभिनव नाटक दावुनि करूं गे जनतृप्ती ॥ १ ॥

नटी—प्राणनाथ, फार चांगलं; त्यांतून सध्यांचा हा ऋतुकालही आपणाला अनकूलच आहे.

पद (' माझा प्राणेश्वर जिवलग ' या चालीवर)

आला शरत्काल चांगला ॥ होतो हर्ष मनीं बहु मजला ॥ हा चंद्र पहा वर्षतो विमल कौमुदिला ॥ जणुं धवल वसन नेसवी दिशासुंदरिला ॥ १ ॥ फुल-

ल्या मालति शेफालिका ॥ बंधुक केतकि कल्हारिका ॥ किति काशकुसुमगंध हा सुखवि प्राणाला ॥ अति मुदित मनें कामिनी करि विलासाला ॥ २ ॥

सूत्रधार—प्रिये, खरंच आहे. हें पहा!

पद ॥ (' वीरा भ्रमरा ' या चालीवर.)

गौरचंद्रकिरणांनीं रजनी अमृत जणुं वर्षती ॥ अथवा कर्पूरा प्रसवनी ॥ सप्तच्छद-पुंडरीक कुमुदिनि-काशकुसुम-केसरीं ॥ झाली धवलित दिक्सुंदरी॥ हंस क्रौंच मिथुनांकित सरिता-पुलिनें किति शोभती॥ जलाशय स्वादु विमल भासती ॥ सकल जगाला शरत्काल हा सुखदायक जाहला ॥ मालतीपरिमल हा सूटला ॥ १ ॥

नटी—प्राणनाथ! तसंच हें पाहिलंत का?

पद (' स्फटिकाचे हे ' या चालीवर.)

श्वेत पद्म शिरिं छत्र धरोनी । शरद्रूप हा प्रविष्ट होतो॥ ध्रृ०॥ मधुप बंदिजन मत्त होउनी मंजुल शब्दें ज्यास वर्णितो॥ पद्मिनिगण हा वैभव ज्याचें पाहुनि सस्मित हास्य करितो ॥ ललितधीर हा राजहंस जणुं विजयी होउनि उत्सव करितो ॥ १ ॥

[पडद्यांत] शाबास ! आर्यके शाबास ! !

श्लोक (मालिनी)

चतुरुदधिसमंता भूमि हा भूप पाळी ॥ गुणललित विलासी शत्रुतें जो निमाळी ॥ अतुल सुयश ज्याचें

ठाउकें या जगाला ॥ उदयन नृपती हा कोण ब-र्णी न याला ॥ १ ॥

नटी–[घाबरून] अगबाई ! हा कोण बरं आपल्या मेघासारख्या मत्त व गंभीर शब्दानेंमला शाबासकी देत आहे?

सूत्रधार—हं समजलों. हा वत्सराजाचा सेनापति यौगंधरायण विंध्यकेतु राजाचा पराभव करून दोन राजक-न्यकांसह विजयश्रीनें प्रफुल्लित होत्साता इकडेच येत आहे. तूं केलेल्या शरत्कालवर्णनास वत्सराजाचें वर्णन समजून त्यानें तुला हीं शाबासकी दिली.हा मदोन्मत्त झाला आहे तर याच्या दृष्टीआड निघून जाऊं.

(जातात.)

प्रवेश १ ला.

(नंतर यौगंधरायण व विजयसेन, प्रियदर्शिका व पत्रलेखा यांसह येतात.)

यौगंध०—शाबास ! आर्यके शाबास !!

("चतुरुदधिसमंता"हें पुन्हां ह्मणतो

आज मीं केवढा रणसंग्राम केला पहा—

पद ('वायुनंदन रदन करकर' ही चाल.)

वायुनंदन करुनि कंदन मारि कुंदुनि कौरवातें ॥
तेंवि अजि मीं विंध्यकेतु धाडिला तो यमपुरीतें॥धृ०॥
गडड गर्जुनि मेघ जैसे भेदिती नग अशनिपातें॥
मोडती तरु कडड करुनी थोर झंझा घोरवातें ॥ दुम-

दुम ध्वनी दुंदुभींचा अजुनि चुंबी अंबरातें ॥ १ ॥

विजयसेन—सेनापते, आपण ह्मणतां तें यथार्थ आहे, कारण—

पद (राग—अरबी.)

शक्रापरि नृप हा बलनिधि बंधू दीनांचा॥बलनि-धि॥धृ०॥धनुर्वीर विजयी समरीं शास्ता रिपुचमुचा॥ समरीं॥ ऐकुनि यश ज्याचें डोले राणा अमरांचा ॥ डोले ॥ तत्सैनिक तुह्मी गुहसम विक्रम बहु तुमचा॥ गुहसम ॥ चाल॥ राजविजयलक्ष्मी या अरिच्या घेउ-नियां आलां स्वामीचरणा न्यायाला ॥ स्वामी॥१॥

यौगंध०—विजयसेन ! हा महाराजांच्याच चरणांचा प्रताप. नाहींतर विंध्यकेतु काय सामान्य वीर होता? पहा—

पद (राग-शंकराभरण.)

समरगंभीर अति धीर वीरें पहा ॥ चंडकोदंडसह युद्ध केलें ॥ मत्तमातंगरणरंगपारंगता दावुनी सुर नभीं शांतवले ॥ किती थोर वीर तो शूरकर्मा ॥ वर्णवेना तया प्रथितनामा ॥ किती थोर० ॥

विजय०— सेनापते, आपण ह्मणतां त्याप्रमाणेंच तो शूर होता खरा.

यौगंध०—असो, आतां या श्री आणि सरस्वती महाराजांच्या चरणीं अर्पण केल्या ह्मणजे आपली स्वामीसेवा संपली.

प्रियदर्शिका—हर हर! देवा ! ! काय आतां मला हे राजाकडे नजराणा ह्मणून कां घेऊन जाणार !!!

पद. ('जन्मा मी व्यर्थ आलें' ही चाल.)

हतभागी मी ठरलें ॥ध्रु०॥ मम दुर्दैवानें परदासी बनलें ॥ मरण आतां देई देवा जन्मा कां आलें ॥ हाय ! हाय ! हाय ! हाय ! ! ॥ हतभागी मी ठरलें॥ मम तातजननिला बहु तचि शिणवीलें ॥ राजकुलिच्या वैभवाला आतां मी मुकलें ॥ हाय ! हाय ! हाय ! हाय ! ! ॥ हतभागी मी ठरलें ॥

पत्रलेखा—सखे, असा शोक करूं नकोस. मनाला कांहीं तरी धीर दिला पाहिजे.

प्रिय०—पत्रलेखे मी धीर तरी कसा धरूं सांग बरं? कारण बाबांच्या अत्यंत स्नेहामुळें ज्यांनीं माझं पोटच्या मुलीप्रमाणें पालन केलं त्या विंध्यकेतूची परचक्रानं कशी बाई दशा केली !

पत्र०—खरंच गडे ! तुझं स्वयंवर करण्याचा महाराजांचा विचार होता, तोंच हा प्रसंग ओढवला ! !

प्रिय०— अंजनीगीत.

हा ताता ! हा माते !! कैसें ॥ मजवरि संकट आलें ऐसें॥माझी आतां घडगत न दिसे ॥ शरण कुणा जाऊं॥

पत्र०—[आठवून] खरंच, पण गडे ! ज्याकडेस हे आपल्याला नेत आहेत तो वत्सराजा सार्वभौम पृथ्वीपति असून नळ, दिलीप, रघु, यांच्यासारखा गुणसंपन्न असल्याची कीर्ति सर्व जगाला विश्रुत आहेच व त्याचे सेनापतिही शूर, नम्र व विजयशाली असून दयाळू आहेत.

प्रिय०—बरं मग म्हणतेस तरी काय?

पत्र०—म्हणून म्हणतें कीं उगीच काळजी करूं नकोस. कदाचित् सुदैवानें तूं त्या राजाचीच पट्टराणी होशील. मला वाटतं स्वयंवरांत देखील तूं त्यालाच माळ घातली असतीस.

प्रिय०—पत्रलेखे, मी एकदां त्या राजगृहीं दास्यत्वांत जाऊन पडलें, म्हणजे माझा सारा जन्म त्यांतच. मग गडे, मला सुखाची आशा उगीच कशाला लावून ठेवितेस?

पत्र०—गडे, वीज मेघाला भेटल्यावांचून राहिली आहे का?

यौगंध०—विजयसेन, या कन्या राजकुलांतल्या असल्यामुळें फार लज्जावती दिसतात. मीं वारंवार विचारून पाहिलें परंतु व्यर्थ! तेव्हां तूं तरी त्यांचें नांवगांव विचारून पहा बरें?

विजय०—[आपल्याशीं] या स्वारीची वृत्ति चंचल दिसते. निदान मुक्ताफळें तरी कर्णीं पडावीं असा यांचा मनोदय दिसतो. (उघड) आर्या यौगंधरायणा, मला वाटतें कीं यांपैकीं जी अति नाजुक आहे ती राजकन्या असून दुसरी तिची सखी असावी. या विनयशील कन्येकांचें नामकुल विचारून यांचा उपमर्द कशाला करावा?

यौगंध०—[आपल्याशीं] हे राजश्री वेदांती दिसतात; तर आपणच पुन्हां यांना विचारून पहावें. [उघड] हे विनयवतींनो! तुम्ही आपलें नामकुल काय, हें आतां तरी सांगाल काय?

प्रिय०—पत्रलेखे! आतां माझा मान बाई तूंच राख.

पत्र०—[मनांत] आतां कसं करावं? जर सखीचा नामकुलवृत्तांत यांना सांगवा तर हिला दुप्पट दुःख होईल. तर यांची कांहीं तरी युक्तीनेंच समजूत केली पाहिजे. [उघड] सेनापति महाराज—

यौगंध०—[आनंदानें] वाहवा! धन्य आहे मी!! आर्ये बोल.

पत्र०—या भर्तृदारिकेचा नामकुवृत्तांत मला मुळींच ठाऊक नाहीं. हिच्या पित्याच्या घरीं मीं नुकतीच सेवेला राहिलें होतें. तोंच आपण संग्राम करून आह्मांला इकडे आणलंत. शोकामुळें माझ्या सखीला मुळींच बोलवत नाहीं.

विजय०—खरेंच आहे त्यांचें वय कोमळ असून प्रसंगही मोठाच गुदरला. तरी पण तुह्मी मुळींच चिंता करूं नका; कारण आमचे महाराज वत्सराज फार दयाळू आहेत.

पत्र०—आर्या तुझें कल्याण होवो.

यौगंध०—[मनांत] ही जरी आपल्याला दासी ह्मणवून घेते, तथापि या दोघीही एकाच कुळांतल्या असाव्यात असा माझा तर्क आहे. हिची सखी मात्र शोकामुळें गळून गेली आहे. वाहवा! ज्या रूपवती असतात त्या दुःखांत देखील किती सुंदर दिसतात!!

विजय०—मित्रा यौगंधरायणा, आपण बोलत बोलत कौशाम्बीच्या अगदीं राजमार्गांत आलों!

यौगंध०—[पाहून] खरेंच ! वाहवा ! काय ही कौशाम्बीची शोभा—

पद (' कल्पतरू हे जिकडे तिकडे. ' ही चाल.)

जिकडे तिकडे उंच मंदिरें सौध विशालहि किती सुवर्णमंडित उंच गोपुरें जणुं स्वर्गा चुंबिती ॥ धृ० ॥ वेत्रवतीचीं कमलवनें हीं नयनातें सुखविती ॥ वातायनप्रांतांत बैसती ललना या सुदती ॥ चाल ॥ या उपवनपंक्ती हर्षविती दृष्टिला ॥ या राजमार्गी हा विटनटगण चालला ॥ हा गणिकासदनीं कामोत्सव वाढला ॥ चाल ॥ पाहुनि कौशाम्बीची शोभा लोचन मम दीपले ॥ महेंद्राच्या अमरावतिचें वैभव जणुं कोंदलें ॥ १ ॥

विजय०—चला तर आतां महाराजांच्या दर्शनाला जाऊं.

(जातात)

प्रवेश दुसरा.

(सिंहासनारूढ झालेला राजा व विदूषक प्रवेश करितात!

वैतालिक —[पडद्यांत] जयजयकार महाराज)

चूर्णिका.

अतिचंड मार्तंडकिरण शिरिं साहुनि उचंड तरुवर थंड छायिं अंडजमृगपांथगण शांतवि जैसा ॥ अतिचंड कोदंड धनु गांडिवसम धरुनि उद्दंड रिपुकुलांसि उदंड दंडुनि ब्रम्हांड धुंडुवि दानवकरिगंडकंडु शम-

विशी वत्सराजा ॥ शशिकुलमंडलमंडन रिपुखंडन करगंड मंडित तुंडा शुंडानन सुंदरि पुंडरीकवसना उभय मिळुनि तव गृहीं नांदती वत्सराजा॥भर्ता समुद्रमालामेखलाभूचा हर्ता शचिसम प्रद्योत तनयेचा तूंचिरे तूंचि वत्सराजा ॥

विदूषक—मित्रा, या रांडलेक वैतालिकानें तुला प्रद्योततनयेचें हरण करणारा असें विशेषण देऊन खासा चोर ठरवलें बरें !!

राजा—सख्या या वैतालिकानें प्रद्योत राजाच्या नांवाचें मला स्मरण देऊन किती तरी गतचरित्राचा भाग चित्रपटासारखा मजपुढें मांडला आहे. पहा—

पद (' ज्यावरि मीं विश्वास ' ह्या चालीवर.)

कारागृहिं मीं जरि बहु काला ॥ घालविलें तीर खेद न आला ॥ प्रद्योताची प्रियकर बाला ॥ वश झाली मजला ॥१॥सचिवांनीं नच नीतिस त्यजिलें॥ प्रजाप्रेम तें द्विगुणित झालें ॥ यौगंधानें मज सोडविलें ॥ रणकर्मा करूनी ॥ २ ॥

विदू०—मित्रा, तर मग एकूण प्रद्योताच्या कारागृहानें तुजवर उलट मोठे उपकार केले ह्मणावयाचे.

राजा—अरे हें अगदीं उघडच आहे.

पद (राग सोहनी ताल त्रिवट.)

मधु मधुर वचन बोलोनी ॥ रंजवि मन माझें जी बंधनीं ॥ मधुर० ॥ धृ० ॥ प्रद्योताची दुहिता जी मज

कारागृहिं झाली वशिनी ॥ प्राप्त झालि शेवटिं ती मजला वासवदत्ता रमणी ॥ मधुर० ॥ १ ॥

मित्रा ! तें राहूंदे आतां. आपला मांडलिक राजा विंध्यकेतु हा वार्षिक खंडणी देईना ह्मणून मीं यौगंधरायण सेनापतीला सैन्य देऊन त्याच्याकडे पाठविलें आहे. काय करावें? पहा —

पद ('करी गोडिनें तूं' ह्या चालीवर.)

बहुकाळ गेला तया जाउनी ॥ वसे थोर चिंता ही माझ्या मनीं ॥ बहु० ॥ धृ० ॥ जयश्री तयाला वरी वानवा ॥ नये झोंप मातें सुखें माधवा ॥ १ ॥

विदू०—मित्रा, महेंद्र देखील समरांत तुजवर सर्व भार ठेवतो, मग विंध्यकेतूची ती काय कथा ?

(प्रतिहारी प्रवेश करिते.)

प्रतिहारी—महाराजांचा विजय असो. विंध्यकेतूचा पराभव करून त्याच्या श्री आणि सरस्वतीच कीं काय अशा दोन कन्यांसह यौगंधरायण व विजयसेन विजयी होऊन आले आहेत. यावर महाराजांची मर्जी—

राजा—[आनंदानें तिच्या अंगावर शेला फेंकून देतो.] वाहवा ! जा जा !! त्यांना घेऊन ये.

प्रति०—आज्ञा महाराज !

(निघून जाते व यौगंधरायण, विजयसेन, प्रियदर्शिका व पत्रलेखा यांसह प्रवेश करिते.)

चलावं; महाराज आपली गांठ घेण्याला अति उत्सुक आहेत.

विजय०—यौगंधरायणा, हे पहा चारी वर्णांचे शास्ते आपले महाराज धर्मासनावर विराजमान आहेत.

पद—(राग शंकराभरण)

किती थोर गंभीर हा भूप दिसतो ॥ अंतरात्मा पहा शांत करितो ॥ ध्रु० ॥ सप्तद्वीपांकिता भूमितें शासुनी चक्रवर्ती महानाम धरितो ॥ पुण्यकीर्ती महाबाहु आखंडला तुल्य हा लोचनां हर्ष देतो ॥ १ ॥

यौगंध०—अहो हा धर्मात्मा तसाच आहे.

पद (राग शंकराभरण.)

सुगुणसिंधू पहा इंदुमुख हा दिसे ॥ उदयगिरिवरि रविच उदयलासे ॥ध्रु०॥ चंड कोदंड हा गांडिवासम धरी ॥ दंडिउद्दंडजनकंडुभासे ॥ सकलश्रीमंतसामंतसीमंतपर्यंतचुंबितपद हा सुविलसे ॥ १ ॥

[पुढें होऊन] विंध्यकेतूचें शासन करून त्याचे सर्वस्वरूपी या दोन राजकन्या उपायनभूत आणणारा यौगंधरायण महाराजांचे चरणीं प्रणिपात करितो, (यौगंधरायण व विजयसेन खालीं वाकतात.)

राजा—(सिंहासनाखालीं उतरून) यौगंधरायणा !

पद (राग हम्मीर) त्रिवट.

विजय तुझा मज बहु सुखवी ॥ विक्रम तव हा पाहुनि अंतरिं तोष मला होई ॥ ध्रु० ॥ क्रौंच विदीर्ण गुहें केलें ॥ अरुणें तिमिरा लोपविलें ॥ त्यापरि तूं रिपुसी हरिलें॥ मम भुजबल या अवनितलावरि॥ रक्षियलें पाहीं ॥ विजय० ॥ १ ॥

विजयसेन तुमचेंही स्वागत असो. तुम्ही उभयतांही

मला आलिंगन द्या. (दोघेही सादर आलिंगन देतात.)

(राजा सिंहासनावर बसतो.) बरें पण यौगंधरायणा, विशाखाच्या दोन नक्षत्रांप्रमाणें शोभणाऱ्या या कोण बरं?

विदू०—नक्षत्रांचा अधिपति जो चंद्र तो तूंच या भूलोकीं अवतरला आहेस, ह्मणून तुला पाहण्याकरितां त्या आल्या आहेत असें वाटतें.

यौगंध०—महाराज! जिच्या अंगावर वस्त्राभरणें अधिक आहेत अशी ही राजकन्या आहे व दुसरी ही तिची सखी आहे. अगोदरच ही सुकुमार असून बंधुवियोगदुःखानें विशेष म्लान झाली आहे.

राजा—(प्रियदर्शिकेस पाहून) खरेंच ही—

पद (' शैवालें युक्त जैसें ' या चालीवर.)

विनयवती शोकभारें खिन्न बहू दीसते ॥ जणुं दुसरी जानकी ही वनवासी वाटते ॥ दुःखार्ता करुणमूर्ती द्रव हृदया आणिते ॥ लावण्यें श्रीरतीला मागें ही सारिते ॥ १ ॥

प्रिय०—अगबाई! वर्णनावरून हृदयांत जें चित्र काढलं होतं त्यापेक्षां हा राजा शतपट सुंदर दिसतो.

(पद. ' प्रार्थना सुधी० ' या चालीवर.)

पाहुनी नृपास या मनोहरा ॥ मोह अंतरीं पडे मला खरा ॥ ललितधीर थोर वीर रूपसागरा ॥ किती बघूं नरेश्वरा ॥ मदनसुंदरा ॥ पा० ॥

पत०—माझ्या सखीनं याचं जें वर्णन केलं तें अगदीं यथार्थ आहे.

प्रिय०—गडे हें सर्व जरी खरं आहे तरी त्याचा मला काय उपयोग?

विदू०——मित्रा, या प्राप्त झालेल्या नववधूशीं एकदा चें लग्न उरकून टाक कसें! बाकी लड्डूची तयारी आमच्या कडेस लागली!

राजा——अहो ज्या जात्याच सुंदर असतात त्या दुःखांत देखील किती मनोहर दिसतात! पहा---

पद (' तस्करा हातीं ' ह्या चालीवर.)

रक्त किती हीचें ॥ हीचें मुख झालें ॥ अधरही शुष्क पहा पडले ॥ नेत्रीं हे बिंदू॥ बिंदू फार आले मुखाहुनि खालीं ओघळले ॥ कमल जसें ओलें ॥ ओलें बहु झालें॥ दवानें सिंचित जें केलें ॥ रक्त०१

हे सुंदरीनों——

पद (' रमा करी मम ' ह्या चालीवर.)

आतां धरूं नका मनिं भीती॥ सुंदरिनों हें स्वसदन मानुनि इथें करावी सुखवसती॥ धृ० ॥ लाजविलें समरांगणिं पडुनी ॥ विंध्यनृपें आह्मां सकलां ॥ जय साधियला ॥ आह्मां वरती ॥सुंदारिनों हें स्वसदन मानुनि० ॥

पत्र०——सखे पाहिलंस ना, हा राजा किती चतुर व गुणवान् आहे तें!

प्रिय०——होय, खरंच गडे.

पद०——(' आज श्याम मोहेकिनो , ह्या चालीवर.)

वदनचंद्र जणुं याचा मधुर सुधा वर्षतसे॥ गुण जै-

से रूप तसें शोभा या देत असे ॥ धृ० ॥ उदयाचलिं रवि तैसा सिंहासनिं हा विलसे ॥ चुंबकमणिसम माझें मन हरुनी नेत असे ॥ वदन ॥ १ ॥

राजा—यौगंधरायणा, विजयसेनानें आपल्या नांवाप्रमाणें कीर्ति केली हें पाहून मला फार संतोष होतो.

यौगंध०—महाराज विजयसेनानें मला साहाय्य केलें ह्मणूनच जय मिळाला, नाहींतर विंध्यकेतु कांहीं सामान्य वीर नव्हता. पहा —

पद (' शलिकुल भूषण ' ह्या चालीवर.)

भयंकर रण जें आह्मिं केलें ॥ त्याच्या तुल्य न कधीं झालें ॥ धृ० ॥ घनसम गर्जति कीं दंती ॥ रथावरि रथ ते आपटती ॥ धनुचे टणत्कार होती ॥ भीषण शंख-घोष घुमती ॥ चाल ॥ विंध्यकेतु तो चमुजलधीचा और्वानल गमला ॥ जयाची विक्रमता अतुला ॥ १ ॥

विजय०—हा सर्व स्वामिचरणांचाच प्रताप ! कारण,

दिंडी.

विजयि होउनियां दास जरी आला ॥ पात्र नाहीं तो स्वामिगौरवाला ॥ सूर्यकांता जें तेज प्रखर येतें ॥ त्या न नैसर्गिक परी रवीचें तें ॥ १ ॥

राजा—विजयसेन, हा विनय तुमच्या पराक्रमाला फारच शोभा देतो. (एकीकडे) ही चंद्रमुखी सुस्निग्ध दृष्टि वक्र करून हा वेळपर्यंत मजकडेस पहात होती. मग आ-

तांच हिनें आपला वदनशशि कां बों वळवला? हां, समजलों.

साकी.

हळुच लपुनि ही मजला निरखुनि भाव आपुला दावी ॥ मेघ पाहतां जशी विनोदें सौदामिनी मुख लपवी ॥ त्या परि बघुनि मला ॥ व्यक्त करी निज प्रेमाला ॥

वि०—मित्रा, आतां हें आपलें कारस्थान लौकर आटप कसें, कारण इकडे हे माझे प्राण भुकेनें कसे व्याकुळ झाले आहेत.

राजा—वाहवारे बुभुक्षिताचार्या !

वैतालिक—(पडद्यांत)

पद (राग—सारंग.)

नभमध्यावरि दिनकर आला ॥ यावें स्वामि अतां स्नानाला ॥ धृ० ॥ चंदनमय अंगराग वांटु-नि ॥ ठेवियले हे दासिजनांनीं ॥ हेमघटांकित गौर कुचांनीं ॥ स्नानभूमि ही शोभे अतुला ॥ नभ० १॥

वि०—मित्रा, हा वैतालिक स्नानशाळेंत जाण्याची वेळ झाली असें सुचवीत आहे.

राजा—चल तर जाऊं या. प्रतिहारिके, यौगंधरायण व विजयसेन यांना जामदारखान्यांत घेऊन जा; व या रा-जकन्यकांना अंतःपुरांत नेऊन राणीच्या स्वाधीन कर.

प्रति०—जशी महाराजांची आज्ञा.

यौगंध०—राजाधिराज ?

साकी

इतरां जें वच बहु मोलाचें त्या या जयशब्दानें ॥
गौरविलें दासास स्वामिनीं थोर अशा सन्मानें ॥
झालों जयशाली ॥ कांहीं आशा नच उरली ॥

प्रिय०—आतां याचें दर्शन मला कव्हां होईल कोण जाणे ?

पद (' परि राखी श्रीहरी ' ह्या चालीवर.)

झालें मी बावरी ॥ या समयीं ॥ धृ० ॥ कांहीं सुचेना ॥ पाय निघेना ॥ चंद्रवदन हें मज सोडवेना॥
थांव गडे नूपुर गळलें तरि ॥ झालें० ॥

(दोघी जातात.)

[राजा तिजकडे पहात राहतो]

विदू०—मित्रा, तुला या राजकन्येच्या नादांत कांहींसुद्धां भान राहिलें नाहीं. हा पाहिलास का भगवान् सहस्ररश्मी नभोमंडलाच्या मध्यभागीं आला.—

राजा—खरंच मित्रा, हा दुसरा चमत्कार पहा—

पद. (राग—सारंग.)

हंसाचा गण हा कमलांच्या पत्रछाये बसला ॥
छत्रापरि शिखि हा रवितापें धरितो शिरीं बर्हाला ॥
पारावत पंक्ति त्रस्त अती सेविति गृहवापीला ॥
रोमंथा करिती हरिण पहा बैसुनि तरुछायेला ॥

[जातात.]

प्रथमांक समाप्त.

अंक दुसरा.

(चतुरिका व कुसुमावती प्रवेश करितात.)

चतुरिका—कायग कुसुमावती, एवढ्या घाईघाईनें चाललीस तरी कुणीकडे ?

कुसुमावती—अग आज अर्धा महिना होत आला, महाराजांची वृत्ति बाई फारच पालटली आहे.

चतु०—अग असं झालं तरी काय त्यांना ?

कुसु०—चतुरिके, यौगंधरायणानें विजय संपादून जिला हरण करून आणलें त्या विंध्यकेतूच्या कन्येनें तर बाई त्यांना वेड लावलें आहे. अलीकडे राज्यकारभार तर सोडू-नच दिला. आहार नको, विहार नको, मृगया नको, अहोरात्र तिचें ध्यान करीत असतात.

चतु०—अग पण हें राणी वासवदत्तेला कळलें असेलच.

कुसु०—अग तर, त्या राजकन्येला राजसभेत आणल्यावर तिला पाहून महाराजांची झालेली चंचलवृत्ति उभयतांचें चोरून प्रेमानें पाहणें, सलज्ज हास्य करणें वगैरे सर्व वृत्तांत प्रतिहारिकेनें येऊन राणीला सांगितला. तेव्हां-पासून त्यांचें अंतःकरण तिळतिळ तुटतें आहे! या साऱ्या अर्धमासांत त्यांनीं देवी वासवदत्तेच्या मंदिरांत पाय ठेवला असेल तर शपथ. तरुण कामीजनांची प्रीति त्यांच्या डोळ्यांत मात्र असते, हृदयांत अगदीं नसते, ही म्हण अगदीं खरी आहे. यामुळें ती बिचारी झुरणीस लागली आहे.

चतु०—अग, सवतिमत्सर हा स्त्रियांचा उपजत स्वभाव आहे. गडे, बरं मग पुढं?

कुसु०—तेव्हां कुलदेवतांचें आराधन केलें असतां, महाराजांच्या वृत्तींत बदल पडेल म्हणून राणीनं अपर्णाव्रत धरलें होतें, त्याची सांगता आज आहे; व त्याकरितां माधवभटजीला भोजनाचें निमंत्रण सांगून ये असें राणीसाहेब ह्मणाल्या. तेव्हां त्याच्या मी शोधांत आहें.

चतु०—सखे, तूं राणीसाहेबांच्या जवळ असल्याकारणानें तुला सर्व अंतस्थ वृत्तांत माहीत होतो. बरं तर मीही नित्याप्रमाणें राणीच्या पूजेकरितां पुष्करिणींतली नीळकमळें व दूर्वा तोडून घेऊन जातें.

(चतुरिका जाते.)

कुसु०—आतां त्या द्वाड भटाची कोठें बरें गांठ पडेल? बहुतकरून तो राजवाड्याच्या मधल्या चौकांत अजगरासारखा घोरत पडला असेल. त्या भटाचा भोजन आणि निद्रा हाच कायतो धंदा. [पुढें जाते व त्याला पाहून दचकते.] पहा, हेंच तें ध्यान! कसा एखाद्या स्वच्छंदी हरणासारखा अस्ताव्यस्त हातपाय पसरून घोरत पडला आहे!! [हालवून] माधवभटजी, अहो माधवभटजी, उठा उठा लवकर.

विदू०—[आळेपिळे देऊन चावळतो] मित्रा, तूंच आपल्या प्रियकरणीला शोध जा. मला आपला झोंप घेऊं दे कसा!

कुसु०—[मनांत] ह्या भोळ्या भटानें झोंपेंत चावळून महाराजांचें रहस्य फोडलें. [उघड] भटजी, उठा उठा.

विदू०—[किंचित् जागा होऊन] कांग चेटी, अगदीं पहांटेसच आलीस? कांहीं मोदक बिदक आहेत कीं काय?

कुसु०—[मनांत]ही थट्टेची वेळ बरी आहे. [उघड] भडजी मोदक नाहीं नी कांहीं नाहीं. तुह्मी आतां झोंपेंत चावळून महाराजांचें जें रहस्य फोडलेंत तेंच काढून घेण्याकरितां मी राणीसाहेबांकडून आलें होतें.

विदू०—[आपल्याशीं] हरहर! झोंपेंत भान न राहतां चावळल्यामुळें असा प्रमाद घडला. [उघड रागानें] कायग ए बटकीचे पोरी! पारधी जसे सशाला जाळ्यांतून हुसकावून लावतात तसें तूं मला धुसकून धुसकून उठविलेंस; तर थांब, या माझ्या दंडकाष्ठानें तुझी कंबर मोडून टाकतों. [रागानें काठी उगारतो.]

कुसु०—भटजी, मी गरीब; मजवर कां तुमचं शस्त्र? (एकीकडे) मेल्याच्या हातावर जसं सदा नक्षत्रच पडलं आहे. [उघड] भडजी मीं तुमची थट्टा केली. हें पहा राणीनें आज तुह्माला ब्राह्मण सांगितलं आहे. मोदकांची चंगळ नी वर दक्षणा, मग तर यालना?

विदू०—[मोठ्यानें हंसून] अग रांडेचे पोरी, मग अगोदर काय झालं होतं असं न ह्मणायला? हें पहा वासवदत्तेला सांग कीं माझें सध्यांचें अजीर्ण जर जिरलें तर मी येईन. पण थांबहो! नाहीं. येईनच ह्मणून सांग.

[आपल्याशीं] आयती दक्षिणा तरी कां सोडा?

कुसु०—बरं.

(कुसुमावती जाते.)

विदू०--[कष्टानें उभा राहून,]

शिव! शिव।! शिव!!!

कटाव

या मित्राच्या नादीं लागुनी ॥ गेलों मी बहु कंटाळुनी ॥ माझि दया त्याला कोठुनी ॥ विंध्यकेतुची कन्या कोणी ॥ जीस आणिलें यानें जिंकुनि ॥ दृष्टीस ती पडल्यापासूनी ॥ गेला राजा वेडा होउनि ॥ तिजसाठीं हा भटकत फिरतो ॥ आपणासंगें मलाहि नेतो ॥ घोडीमागुनी शिंगरूं जैसें ॥ ओढुनि नेतो मलाहि तैसें ॥ प्रमदवनांतुनि क्रीडा शैलीं ॥ क्रीडाशैलावरुनी खालीं ॥ खालुनि वरती वरतुनि खालीं ॥ ऐसें करुनी तनु ही शिणली ॥ माझ्या आतां बोकांडींची ॥ पिशाचबाधा जाते कैची ॥ अर्ध मास गेला होवोनी ॥ झोंप न ठाउक मजला नयनीं ॥ प्राण चालला माझा निघुनी ॥ ॥ चाल ॥ हा राजा वेडा झाला ॥ भलतिच्याच नादीं पडला ॥ १ ॥

असो, माझा मित्र इकडे येईपर्यंत या थंडगार चंद्रकांतमण्याच्या फरशीवर बसून क्षणभर विश्रांति घ्यावी.

(राजा प्रवेश करितो.)

राजा—सर्व रात्रभर त्या सुंदरीच्या विरहानें झोंप न लागल्यामुळें मला जो ताप झाला होता, तो या प्रभातकालच्या मंद मारुतानें संपूर्ण नाहींसा केला. अहाहा! किती शांत वेळ आहे ही!

पद (' किती तरी पहांटेची ' ह्या चालीवर.)

सख्यानियां रजनिकाल सुखदायक अरुणोदय झाला ॥ धृ० ॥ मंद मंद अति कोमल ॥ वायु सुटे हा शीतल ॥ कमलगर्भशयन मृदुल ॥ त्यजुनि भ्रमर ऊठती ॥ १ ॥ तारागण नष्ट होती ॥ कुमुदिनि निज कोश मिटती ॥ चिरविरहिणिगंडकांति ॥ येत शशिमंडला ॥ २ ॥ जणु भार्या इंद्राची ॥ प्रसवलि रविसुत प्राची ॥ अरुण करी कुंकुमाची ॥ वृष्टि सकलभूतला ॥ ३ ॥

विदू०—हा पहा ज्याचे नेत्र जागरणामुळें आरक्त दिसत आहेत असा हा माझा मित्र इकडेसच येत आहे. [पुढें येऊन] मित्रा, तुझा विजय असो !

राजा—सख्या माधवा, कसें काय, कुशल आहेना ?

विदू०—मित्रा, तुला कोंपरापासून नमस्कार असो. हें पहा असाच जर मी तुझ्या आणखी नादीं लागलों तर माझे प्राण फार दिवस कांहीं वांचणार नाहींत.

राजा—अरे झालें तरी काय ?

विदू०—भली केलीस आतां ! दुसऱ्याच्या डोळ्यांत आपणच बोट घालून उलटें आपणच तूं कां रडतोस म्हणून विचारावें, तसलाच हा तुझा प्रश्न ! मित्रा, तूं आपला जागरणेंकरून निगरगट्ट झाला आहेस; व तुझा क्षत्रियाचा देह असल्यामुळें सर्व कांहीं सहन करण्याची तुला शक्ति आहे. पण मी बिचारा शाल्योदन खाणारा ब्राह्मण, तुजबरोबर हेलपाटे घेतां घेतां मरायला टेंकलों, आहे तर एकदां मला विश्रांति दे कसा ! !

राजा—[मनांत] याचें उदास झालेलें मन आतां दुसरीकडे वळविलें पाहिजे. [उघड] सख्या माधवा, तुला मी लवकरच विश्रांति देईन. पण या आपल्या प्रमदवनाची शोभा सांप्रत पाहिलीस का ?

दिंडी—(लीलांबरी.)

मलयवातें पुष्पिणीडोलताती ॥ नर्तनाचा जणुं भाव दाखवीती ॥ पुष्परूपें तारुण्ययुक्त होती ॥ भृंगशब्दें अव्यक्त गीत गाती ॥

विदू० —मित्रा, खरेंच या मधुमालतीच्या जाळ्यांत परिमळाला भुलून मधुकरांचे थवेच्या थवे जाऊन बसले आहेत व या ठिकाणीं एकसारखा पुष्पांचा वर्षाव होत असल्यामुळें मला वाटतें, आपल्याकरितां उद्यानदेवतेनें हा चित्रविचित्र वर्णांचा मऊ मऊ गालिचाच पसरला आहे ह ह ह ह.

राजा—(मनांत) या गुलामाचें मन दुसरीकडे वळलें हें माझ्या पथ्यावरच आहे. (उघड) मित्रा, तसेंच पहा सांप्रत वर्षाकाल नसूनही आपल्या या प्रमदवनांत त्याचा प्रादुर्भाव झाल्यासारखा दिसतो.

पद (' स्फटिकांचे ते पदपथ ' ह्या चालीवर)

शिरसांचीं कुसुमें भूवरती ॥ गळुनि तृणांकुरसम हीं शोभती ॥ १ ॥ जलयंत्राच्या उडती धारा ॥ वाटे वर्षत मेघ झरारा ॥२॥ बंधुकसुमनें गळुनि खालती ॥ इंद्रगोपसम रक्त दीसती ॥ ३ ॥ या सर्वांना पाहुनि वाटे ॥ वर्षाकाल अकालीं भेटे ॥ ४ ॥

विदू०—मित्रा, अगोदरच माझे हातपाय पहा कसे खांडकासारखे ठणकताहेत, तर ज्यावर द्राक्षालतेची हिरवी-गार दाट छाया पसरली आहे, अशा या शिलातलावर बसूं या, म्हणजे पाय पसरण्याला मिळेल.

राजा—तसें करूं या. [बसतात.]
मित्रा, तुला काय सांगूं! काल सर्व रात्र मीं कष्टानें जागून घालविली ! पहा.

पद. राग—तोडी—[' जन सारे ' या चालीवर.]

सुख वाटे मजला नच सदनीं ॥ निद्रा येई कधिं ना शयनीं ॥ धृ० ॥ मृगया न रुचे पूर्वीसम ती ॥ विरहें गात्रें अति कृश होती ॥ उष्ण श्वासें अधर क-ष्टती ॥ तळमळ करितां न सरे रजनी ॥ सुख० ॥

विदू०—मित्रा, मीं तुला कितीदां तरी सांगितलें कीं, तूं तिचा नाद सोडून दे. तरी तूं आपला अहिल्येवर इंद्र जसा लंपट झाला होता तसा तिजवर झाला आहेस.

राजा—अरे हा तारुण्याचा दोष; माझा मुळींच नाहीं.

विदू०—मित्रा, मी तुला फिरून असें विचारितों कीं, तूं असा जो लाळ घोटीत बसला आहेस, त्यापेक्षां तिच्याशीं एकदम लग्न कां करून टाकीत नाहींस ?

राजा—मित्रा, असें जर करतां येतें तर माझ्यासारखा या जगांत कोणीच सुखी उरला नसता. परंतु त्या राजकन्येचा मीं जर उघडपणें अंगीकार केला, तर राणी वासवदत्ता मत्सरभावानें आपल्या जिवाचें काय करील कोण जाणे ?

विदू०—आतां त्या महात्मापुढें मात्र आपलें कांहीं चालणार नाहीं हें खचित.

राजा—मित्रा, तुला काय सांगूं ?

पद.—[' जाउनी सुहृत्सदनीं. ' या चालीवर.]

कधिं तिला बघिन नयनीं ॥ शशिमुखि । माझ्या हृदयीं । वास करी । देतो । स्मर पीडा । तिजसाठीं । मज भारी ॥ धृ० ॥ सतत रुचिर ती तिची मूर्ती ॥ उभि राही ॥ मम चित्तीं ॥ याला मी तरि काय । करूं रे हाय । कोठें ही । करमेना । विरमेना । मज सदनीं ॥ कधिं० ॥

विदू०—पण मित्रा, तूं जो तिच्यावर एवढा अनुरक्त झाला आहेस, अशी ती सुंदर तरी किती आहे ?

राजा—अरे, त्या दिवशीं राजसभेंत तूंच माझ्याजवळ होतास ना ?

विदू०—हो होतों खरा, पण नसल्यासारखाच. कारण, मेंढरेंराख्याला रत्नांची जेवढी परीक्षा तेवढीच मला तिच्या रूपाची परीक्षा.

राजा—तर ऐक.

पद (' काय परम रमणीय ' या चालीवर.)

केतकिगर्भापरि अति गौरा कोमल तनु तीची ॥ स्मित हास्य तिचें मजला वाटे कौमुदि चंद्राची ॥ शृंगाराची मूर्तिच अथवा जणु प्रतिमा रतिची ॥ ब्रह्मदेव इस निर्मुनि करितो कमाल आपुल्या कौशल्याची ॥ केतकि० ॥

विदू०—अरे, हें सर्व खरें; पण तिचा अनुराग तुज-वर असल्याचीं कांहीं चिन्हें तुला दिसलीं का? नाहींतर हें सर्व अरण्यरुदनासारखें होईल.

राजा—अरे, याहून आणखी काय पाहिजे?

पद. (राग मालकस.)

हळुच गालिं स्मित करी सुंदरी ॥ मम वदनातें पाहोनी ॥ धृ० ॥ मृगिसम चंचल नेत्रकटाक्षा टाकी मजवरि लाजोनी ॥ लपुनि छपुनि वच माझें ऐकत। होती प्रेमानें कर्णी ॥ परतुनि जातां नूपुरमिष तें। करुनी मज पाहे फिरुनी ॥ १ ॥

विदू०—[एकीकडे] या राजश्रीच्या हें सर्व पथ्या-वरचेंच आहे.

राजा—तर मित्रा, जेणेंकरून माझ्या जिवाला बरें वाटेल असा कांहीं उपाय काढ बरें!

विदू०—हें पहा, या द्राक्षालतेला कसे मधुर मधुर फळांचे घोंस आले आहेत. यांचा येथेंच फराळ करून वर पुष्करणींतलें थंडगार पाणी प्यावें, हाच बेत मला पसंत वाटतो.

राजा—या बुभुक्षिताचार्याला खाण्याशिवाय कांहींच सुचत नाहीं.

(इतक्यांत प्रियदर्शिका व पत्रलेखा बागेंत हिंडत येतात.)

प्रिय०—पत्रलेखे, त्या पुष्करिणीकडे जाऊं या.

विदू०—मित्रा, या पुष्पवाटिकेच्या आड कोणाचा तरी शब्द ऐकूं येतो.

राजा—काय, माझी थट्टा करतोस वाटतं ?

विदू०—अरे, तुला माझी थट्टा वाटत असेल तर चल पाहूं या.

राजा—बरें तर चल. (वृक्षाआड लपून पाहतात.)

विदू०—मित्रा, तुला आजपर्यंत जिचा निदिध्यास लागला होता तीच ही आपल्या सखीबरोबर बागेंत फिरत आहे. आतां नेत्रांचें पारणें फेडून घे.

राजा—मित्रा, खरेंच, हीच ती प्रियतमा ! अहाहा ! धन्य आहें मी आज ! आतां ह्या काय बोलतात हें लपून ऐकूं या.

पत्र०—सखे प्रियदर्शिके, या प्रमदवनाची शोभा पाहिलीस ना ?

पद (' लायीबहारबागमे ' या चालीवर.)

जाइजुईचमेलिला नवा बहार हा अला ॥ मधुमालति जातिलता कुसुमित या झाल्या ॥ मधुकरगण मधु पिउनी गुंजन करूं लागला ॥ जा० ॥

प्रिय०—पत्रलेखे, या उपवनांत आल्यापासून माझ्या मनाला आनंद न होतां उलटा ताप होतो.

पद. (' धाडुनि दिधलें ' या चालीवर.)

खेळुनि लतिकासंगें तरुवर ॥ चिडविति बघ मजला ॥ धृ० ॥अतिशय माझ्या पीडा देई ॥ हंसनाद हा कानाला ॥ खेळुनि० ॥ कोकिल मंजुल गाउनि माझ्या ॥ पाडि घरें हृदयाला ॥ येथें येउनि उलटा माझ्या ॥ शूळ मस्तकिं उठला ॥ खेळुनि० ॥

पत्र०—अग, महाराजांना त्या दिवशीं पाहिल्यापासून तुझी अशी स्थिति झाली आहे तें मी समजलें.

राजा—ही पत्रलेखा मोठी चतुर खरी.

प्रिय०—

पद. ('चापधरकुमार' या चालीवर.)

कांतवदन तें मजला कधिं पुन्हां दिसे गे ॥ धृ०॥ त्या समयीं राजासनीं ॥ देखियलें मीं नयनीं ॥ परि नाहीं तृप्ति मनीं ॥ जाऊनी बघूं गे ॥ कांत० ॥

पत्र०—अग, वेडे रोहिणीला आपण होऊन चंद्राकडे मुळींच जायला नको. तूं अशी उतावळी कां होतेस? महाराज लवकरच तुझें मनोरथ पूर्ण करतील.

राजा—आहाहा ! किती तरी यांचा हा मौजेचा संवाद आहे ?

प्रिय०—पत्रलेखे हा पहा, या पुष्करिणींत हंसांचा जोडा खेळत आहे. ही हंसी अर्धचार्वित बिसतंतु हंसाला अर्पण करीत आहे. येथून बाई मला हालूं नयेसें वाटतें.

पत्र०—बरें तर. तोंपर्यंत मी तुझी जी आवडती अतिमुक्तलता तिचा समाचार घेऊन येतें. [जाते.]

विदू०—मित्रा, ती रांडलेक पत्रलेखा गेल्यामुळें हा एकांतवास आयताच तुझ्या पथ्यावर पडला; नाहीं का ?

राजा—[हर्ष पावून]

पद ('सायंकाळीं नृपसदनाचा' या चालीवर.)

धन्य धन्य मी आजि जहालों ॥ वाटे सुखशैला वरि बसलों ॥ धृ० ॥ निद्रा नच आल्यानें स्वप्नीं दे-

खिल नच जी दिसली रमणी ॥ तीतें सांमत पाहुनी नयनीं ॥ बावरुनी गेलों ॥ धन्य० ॥ १ ॥

प्रिय०—[घाबरून] अगबाई! कमलिनींच्या परागांची सारी धूळ माझ्या डोळ्यांत घालून मला आंधळी करणारा असा हा मेला दांडगा वारा कुणीकडून आला? [पदरानें डोळे झांकते.]

विदू०—मित्रा, पाहिलेंस का, या प्रचंड वाऱ्यानें उडालेल्या परागांच्या धुळीनें हिचे डोळे अगदीं आंधळे केले आहेत. ह्या वेळेस जर तूं पुढें जाऊन तिला सांवरशील, तर ती तुला पत्रलेखा असें समजून भेटेल. तुझें दैव मोठें खरें!

राजा—वाहवा, काय नामी युक्ति सुचवलीस?

प्रिय०—अगबाई! पत्रलेखे, लवकरच ये, या मेल्यानें पहा माझी काय दशा केली?

विदू०—अग वेडे, या वायूनें तुजवर मोठा उपकार केला असें होणार आहे.

[राजा एकदम जाऊन आलिंगन देतो व ती पत्रलेखा समजून त्यास भेटते.]

प्रिय०—पत्रलेखे, तूं वेळेवर आलीस ह्मणून बाई बरं झालं. नाहींतर या वाऱ्यानें माझी उडून जाण्याची वेळ आली होती. त्या मेल्या दांडग्या वायूचा संचार नाहींसा होईपर्यंत मी मुळींच डोळे उघडणार नाहीं. तूं मला मात्र सोडूं नकोस हो.

राजा—[तिचे नेत्र पुसून]

पद.(' ज्या सदा वसति तुज० ' या चालीवर.)

सुंदरी उघडिं निज नयनकमल ॥ सुंदरी० ॥ भीति धरुं नको त्या पवनाची ॥ धृ० ॥ एकवार मधु हास्य करिशि जरि ॥ मनि मी तरिच हें जन्म सफळ ॥ सुंदरी० ॥

प्रिय०—अगबाई, हा पत्रलेखेचा शब्द नव्हे ! [रागानें] कोण हा चांडाळ मला स्पर्श करित आहे तरी?

(राजाला पाहून लाजून दूर होते.)

राजा-पद. (' झाले बहुदिन मजला० ' या चालीवर.)

दास तुझा सुंदरि हा अन्य कुणि नसे ॥ बहु मजला कुसुमचाप ताप देतसे ॥ मूर्ति तुझी मन्मानस मंदिरीं वसे ॥ या समयीं लीन तुझ्या चरणिं मी असें ॥ १ ॥

(इतक्यांत पत्रलेखा येते.)

पत्र०—[टाळी वाजवून] अगबाई! मोठा वारा सुटून मोतियाची वेल डळमळूं लागली, परंतु ऐन वेळेस आम्रवृक्षानेंच सावरून धरलें. मग मी कशाला हवी आहे?

प्रिय०—पत्रलेखे, या थट्टेची मी तुला केव्हां तरी आठवण देईन हो ?

विदू०—कां मित्रा, तूं एकदीं राज्याचीं सूत्रें हलवितोस; पण अखेरीस मीं सांगितलेली युक्ति फत्ते झालीना? [राजा हंसतो.]

पत्र०—महाराज, या माधवीलतामंडपाखालीं विस्तीर्ण स्फटिकाचा चौरंग आहे यावर बसून अंमळ विश्रांति घ्यावी.

(सर्व बसतात.)

राजा--पत्रलेखे, या तुमच्या सखीचा नामकुलवृत्तांत ऐकण्याची आह्मांला फार उत्सुकता आहे!

पत्र०--सांगतें, ऐकावें महाराज.

पद. (' चंद्रकांत राजाची कन्या. ' या चालीवर.)

अंगदेशनृप मोठा ह्मणती दृढवर्मा ज्याला ॥ एकुलती ही त्याची दुहिता लाजवि जी रतिला ॥ विंध्यकेतु वनराज होता त्याचा प्रिय मित्र । बाल्यापासुनि हिला तयानें केलें गुणपात्र ॥ निजदुहितेसम विंध्यकेतु हिस वाढवि निजसदनीं ॥ तरुछायेसम हिच्यासवें मी होतें सखि ह्मणुनी ॥ करुनि घोर रण आह्मां आणिलें आपुल्या सेनेनें ॥ पुढिल कथा ती काय वदावी आपुल्या वदनानें ॥ १ ॥

विदू०---मित्रा, ही पत्रलेखेनें सांगितलेली सर्वच कथा अगदीं अश्रुतपूर्व दिसते.

पत्र०---महाराज, आपण दुष्टांचे शासनकर्ते आहांत. तर, या आमच्या सखीची दुष्ट मदनानें काय दशा केली आहे पहा! त्याच्या तापापासून हिला सोडवून पदरीं घ्यावें, एवढीच काय ती प्रार्थना आहे.

(प्रियदर्शिका लाजून खालीं बघते.)

राजा---अहाहा सुवदने!

साकी.

रति दुसरी आशि तव सखि इच्छी मम संगम जरि मारी ॥ सुखद चंद्रिका अंगीं पडतां कोण प-

टानें वारी ॥ मजवरि हा तुमचा ॥ अनुग्रह थोर असे साचा ॥ १ ॥

विदू०—पत्रलेखे, मजसारख्याला पंचपक्वान्नांचें आयतें वाढून आलेलें ताट जसें सोडवत नाहीं, तसाच तुझ्या या सखीचा अनादर महाराजांकडून मुळींच होणार नाहीं.

प्रिय०—पत्रलेखे, माझी मस्तकबाधा कांहीं केल्यानें जात नाहीं. काय करूं बाई?

पत्र०—हें पहा, महाराज आतां तुला सर्व बाधेपासून दूर करतील बरें!

प्रिय०—पुरे बाई. तुझी मेली सारी थट्टाच!

[पडद्यांत]

अहो माधवभटजी, राणीसाहेब तुमची वाट पाहत बसल्या आहेत. चला लवकर.

विदू—मित्रा, खरेंच. आज मला राणी वासवदत्तेनें वायन घेण्याकरितां बोलावलें आहे. तर चला, तुझें काय ठीक आहे? पण इकडे भुकेनें माझा जीव कासावीस झाला आहे.

राजा—बरें, महाब्राह्मणा, जाऊं चला; नाहीं तर ती चेटी इकडे येऊन हें वर्तमान राणीला सांगेल.

पत्र०—महाराज, आपल्या दर्शनानें आज आपल्या सखीवर मोठा अनुग्रह केला. मात्र एवढीच विनंति आहे कीं अंतःपुरांत गेल्यावर आमच्या सखीचा विसर पडूं नये.

राजा—पत्रलेखे?

पद. राग देस (' अधिकार जो मला ' या चालीवर.)

तव प्रियसखिला विसरेन काय ॥ कां लाजविसी ॥ एक क्षण मज युगसम जाय ॥ धृ० ॥ आधिंच तव सखिविरहें छळिलें ॥ त्यांत तिनें मन माझें हरिलें ॥ उरला मागें हा जड काय ॥ तव० ॥ १ ॥

विदू०—पत्रलेखे, आज महिनाभर या राजश्रींनीं जर अंतःपुराचें दर्शन घेतलें असेल तर शपथ.

प्रिय०—पत्रलेखे, हा भट संपादणी करण्यांत मोठा चतुर दिसतो ग!

विदू०—मित्रा, हें वर्तमान जर त्या चेटींनें जाऊन राणीला सांगितलें तर अगोदर आमचेंच यथेच्छ कांडात निघेल; तर चल कसा लवकर.

राजा—पत्रलेखे, लवकरच [दोघे जाऊं लागतात] मी पुन्हां भेटेन. [पडद्यांत] अहो भटजी-

पत्र०—सखे महाराजांचें आश्वासन मिळालें. तर आतां स्नानाला जाऊंया.

प्रिय०—पद. (' कां आड सखे ' या चालीवर.)

कां घाइ करिसी गे वांया ॥ धृ० ॥ बहु कष्टानें दर्शन घडलें ॥ मधुर बोल ते कर्णीं पडले ॥ परि वेडें मन तृप्त न झालें ॥ उचले पद नच जाया ॥ माझें ॥ कां० ॥

[राजाकडे पाहत निघून जातात]

विदू०—मित्रा, चल आतां ती दूर गेली.

राजा—पद. (राग पिलु) *

कधिं सुंदरि ती पुनरपि भेटे ॥ उत्कंठेनें मन हें

दाटे ॥ धृ० ॥ उठली जी आलिंगनसमयीं ॥ रोमांचांची पंक्ति देहीं॥ती अद्यापि न जाई वाटे॥कधिं०१॥

(अंक दुसरा समाप्त.)

अंक तिसरा.

प्रवेश १ ला.

(राणी दासीसह प्रवेश करिते.)

राणी—सखे कुसुमावती,

पद. (' स्फटिकांचे हे ' या चालीवर.)

व्यर्थ असे समजूत जनांची ॥ राजस्त्रियेला सुख बहु असतें ॥ अंतःपुरिंची परि स्थिति कोणा॥इतर जनाला ठाऊक नसते ॥ नाथ पहा हे आमुचे कैसे॥ नवयुवतीलंपट झाले ते ॥ या चिंतेनें निशिदिनिं माझें ॥ मन बघ कैसें तिळतिळ तुटतें ॥ १ ॥

कुसु०—बाईसाहेब, उगीच शोक करून आपलें जिवाला वाईट वाटून घेऊं नका.

राणी—गडे कुसुमावती,

पद (' आजि शेवटचा लाभचि हा ' या चालीवर.)

महाराजांचें मन सवतीवर गेलें ॥ या शोकें मन हुरहुरलें ॥ विरहाग्नीची हृदयीं भडकुनि ज्वाला ॥ करि व्याकुल मम देहाला ॥ चाल ॥ मज बघति न ते ढुंकूनि ॥ नच निद्रा येई शयनीं ॥ चाल ॥ या चिं-

तेनें कांहिं नकोसें झालें ॥ वध उपाय कांहिं न चाले ॥ १ ॥

कुसु०—बाईसाहेब रडून रडून डोळे मुठीसारखे झाले आहेत. हा शोक आतां पुरे नाहीं का करीत?

राणी—[शांत होऊन] कायग कुसुमावती, महाराज व माधवभटजी आज घाईघाईनें राजवाड्याच्या गच्चीवर जातांना मीं पाहिलं असं तूं मला सांगितलंस तें खरंना ?

कुसु०—होय बाईसाहेब ! मीं प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं पाहिलं; आणखी यावरून मला असं वाटतं कीं, जिचा महाराजांना एवढा नाद लागला आहे तिच्याशीं ते त्या एकांतस्थळीं रममाण होणार असतील.

राणी—कुसुमावती, तुझा तर्क अगदीं खरा आहे. हें पहा, त्या दिवशीं प्रतिहारीनं राजसभेंतला तो पोरखेळ सांगितल्यावरून मला तर त्या अवदसेचा पक्का संशय आला आहे. राजसभेंत असतांना उभयतांचं तें चोरून पाहणं, गालांतल्यागालांत हंसणं, हें सर्व मला प्रतिहारीनं येऊन सांगितलं. अग, या सगळ्या महिन्यांत माझ्या मंदिरांत त्यांनीं एकदा तरी पाऊल टाकलं आहे का ? हे विषयलंपट महाराज ज्या दिवशीं ताळ्यावर येतील तो खरा सुदिन असं मी समजेन.

कुसु०—बाईसाहेब, कुळदेवतांच्या प्रसादानं महाराजांची प्रीति आपणांवर पूर्वीप्रमाणं जडेल.

राणी—अग देवता तरी कुठं प्रसन्न होताहेत ?

कुसु०—बाईसाहेब इतक्या ज्या आपण झुरणीला लागलां आहांत त्या सर्वाला कारण त्या अवदसेचंच कौटाळ; तिनं कसं महाराजांवर मोहनास्त्र टाकलं आहे.

राणी०—[संतापून] थांब, या सर्वांचा मीच समाचार घेतें. आतां ते कपटी महाराज बहुतकरून याच वेळेला राजवाड्याच्या गच्चीवर त्या अवदसेबरोबर रममाण झाले असतील; तोंच मी स्वतः जाऊन त्या दोघांचा खरपूस समाचार घेतें.

पद. (' होशिल मग कौसल्यादासी ' या चालीवर.)

त्या विषयी कपटी राजाला ॥ निंदुन आणिन बहुलज्जेला ॥ बांधुन मुसक्या त्या अवदशिला ॥ धाडिन वनवासा ॥ १ ॥ ज्या सटवीनें मम नाथाला ॥ मोहीं पाडुन वेडा केला ॥ सूड तिचा मी उगवायाला ॥ राहिन काशि आतां ॥ २ ॥

(दोघी जातात.)

प्रवेश २ रा.

[उत्कंठित झालेला राजा व विदूषक प्रवेश करितात.]

राजा—

पद. (' कवणें तुज गांजियलें. ' या चालीवर.]

भेटलि त्या समयिं जरी प्राणमोहिनी ॥ परि मन्मथ अद्यापी ताप दे मनीं ॥ धृ० ॥ मदनशरें छिद्र उरीं ॥ जें केलें मम अंतरिं ॥ त्यांतुनि ती कां सुंदरि ॥

आंत गमे गेली तरी ॥ ताप कसा त्यावांचुनि देइ निशिदिनीं ॥ १ ॥

हे कृतघ्ना कुसुमायुधा ! कामदेवा,

पद. [' मजवरि तरु कुसुमरेणु ' या चालीवर.]

अनुदिनिं तुज वाढविलें हृदयिं मी स्मरा ॥ परि विपरित होउनियां छळिशी या नरा ॥ धृ० ॥ पंच बाण सोडुनि मज करिशि घाबरा ॥ दुर्विपाक विषतरुसम होशि तूं खरा ॥ अनु० ॥

विदू०—या प्रदोषकाळची शोभा पाहिलीस का ? या राजवाड्याच्या गच्चीवर चांदणं पहा कसं पिठासारखं पडलं आहे. मला वाटतं आकाशांतून कापुराच्या राशींचाच वर्षाव होत आहे. अथवा हीं चंद्रकिरणं जणुं काय आपुल्या राजवाड्याला सफेतीच देत आहेत ! !

राजा–[श्वास टाकून] सख्या काय सांगूं रे ?

पद. [राग मालकंस, ताल त्रिवट]

चंद्रकिरणिं मम अंग जळे ॥ मंदारपवन नच सुखवि शीत जरि ॥धृ०॥ मणिमाला जरि अंगिं धरिली ॥ तनु तापवि मम उलटी भारी ॥ १ ॥

मित्रा, बरं पण तूं प्रियेकडे माझा निरोप घेऊन गेला होतास, त्याचं काय झालं सांग पाहूं.

विदू०—अरे, मी तिथें गेल्यावर प्रियदर्शिका वहिनी पल्लवशय्येवर म्लान होऊन पडलेली पाहिली. ती लाजेमुळें माझ्याशीं मुळींच बोलली नाहीं. परंतु पत्रलेखा मात्र म्हणाली, कीं माझ्या सखीचा मदनसंताप कमी होण्या-

करितां आज प्रदोषकाळीं महाराजांचे दर्शनासाठीं राजवाड्याचे गच्चीवर तिला घेऊन येईन.

राजा—हे भगवंता रतिरमणा?

साकी.

मजसम तिजला पीडुनि निशिदिनिं तापविशी रे उभयां ॥ परि नच करुणा येइ कठोरा धनुतें सज्ज कराया ॥ संगमसुख जेव्हां ॥ देशिल मानिल तुज तेव्हां॥

विदू०—[आपल्याशीं] हे राजश्री पुन्हां मृगतृष्णिकेच्या मार्गी लागले.

राजा—खरंच मित्रा, आज असं होईल कारे?

पद. (' परम सुवासिक पुष्पें ' या चालीवर.)

शशिवदना या प्रदोषकाळीं दर्शन मजला देईल काय ॥ सखिसह येऊनि सलज्ज मजवरी नेत्रकटाक्षा टाकिल काय॥ हळुच येउनी कोमल कर या कंठीं माझ्या घालिल काय ॥ अधरसुधामधु पाजुनि माझा कठिण रोग हा सारिल काय ॥ १ ॥

विदू०—अरे प्रत्यक्ष भगवान् कामदेव तिचा सहाकारी होऊन लवकरच तिला इथें घेऊन येईल.

राजा—पण मित्रा, तोंपर्यंत मी कशानं मनाचं रंजन करूं सांग बरं?

विदू०—हें बघ, उपाय अगदीं सोपा आहे, तूं डोळे मिटून तिचं चिंतन करीत बैस, व मी या थंडगार चंद्रकिरणांचं सेवन करीत बसतों.

राजा—बरं तर मी तिचें चिंतन करीत बसतों.

(इतक्यांत प्रियदर्शिका अभिसारकेच्या वेषानें पत्रलेखेसह येते)

प्रिय०—

पद. (' या मदनमनोहर रूपीं ' या चालीवर.)

जरि चंद्रवदन तें माझ्या दुसऱ्यानें दृष्टीस पडलें॥
जरि आलिंगन देउनी त्या समयीं मज सांवरिलें ॥
तरि पाहिन केव्हां ऐसें उत्कंठित मन हें झालें ॥
॥ चाल ॥ भेटवी सखे मज त्याला ॥ मम रमणाला ॥
॥ चाल ॥ किति चिंतन मीं तरि केलें ॥ पळ एक युगासम गेलें ॥ १ ॥

पत्र०—अग तूं एवढा नट्टापट्टा करून अभिसारिकेच्या वेषानं त्या राजाकडे घाईघाईनें चालली आहेस, पण ठेंच लागून पडशील हो! कोण तरी मेला ह उतावळेपणा.

प्रिय०—इश्श, पुरे बाई! ही कायग तुझी थट्टा मी नाहीं एवढीं अधीर झालें हो.

पत्र०—गडे, पाहिलास का, धवलचंद्रिकेनं धुतल्यामुळं हंसदेहासारखा पांढरा शुभ्र दिसणारा व फार उंच असल्यामुळं कैलासाशीं स्पर्धा करणारा हा त्या राजाचा राजवाडा. ह्याच्याच गच्चीवर संकेतस्थानीं तुझा प्रियकर तुझी वाट पहात बसला असेल.

प्रिय०—चल तर, मला जिन्याची वाट दाखीव. गडे, पण त्या राजापुढं निर्लज्जासारखं माझ्यानं बाई जाववणार नाहीं.

पत्र०—अग, तुझ्या गळ्यांतला हा हार हळूंच मागून

जाऊन त्याच्या गळ्यांत घाल, म्हणजे तूं आलीस असं तो समजेल. नाहींतरी मी तुझी पाठराखीण आहेंच.

प्रिय०—गडे नामी युक्ति सुचविलीस.

पत्र०—अग, हा पहा मोर जसा मेघमालेची वर मान करून मार्गप्रतीक्षा करतो, तसा हा राजा डोळे लावून तुझी वाट पहात बसला आहे.

प्रिय०—गडे, रत्नभूषणाचा जरी या राजानं त्याग केला आहे तरी हा मला पूर्वींपेक्षांही रमणीय दिसतो !

पद.

हा नृपति किति दिसे मनोहर ॥ सुरपति इंद्रहि तुच्छ खरोखर ॥ धृ० ॥ पाहुनि याला धन्य मी झालें ॥ गांजितसे किती मदन अनावर ॥ १ ॥ अलंकारविरहीत असे परि ॥ निज तेजानें लोपवि दिनकर ॥ २ ॥

पत्र०—अग हा सर्व कामदेवाचा व प्रदोषकाळाचा गुण आहे, समजलीस.

प्रिय०—बरं तर गडे, या उभयतांचा काय संवाद होतो तो ऐकूं नी मग पुढं जाऊं.

विदू०—मित्रा, तुझी करमणूक करण्याचा एक उत्तम उपाय मजजवळ असून मी सांगायला विसरलों. हें पहा, मीं आपल्या पंच्याच्या पदरांत कमलपत्र बांधून आणलं आहे. यावर काय लिहिलं आहे तें तूंच वाच.

राजा—हा मूर्खा, निरक्षरा! आण बरं इकडे पाहूं; [वाचतो] सकलगुणमंडित सार्वभौम वत्सराज यांस—

पद. ('तव मानस कैसें काय' या चालीवर.)

हे भ्रमरा रसिका ॥ मधुपानीं चतुरा ॥ अभिनव मधुनीं युक्त मी नलिनी ॥ आस मनीं धरुनी ॥ बघतें वाट घरा ॥ १ ॥

प्रिय०—अगबाई, मीं लिहिलेला मदनलेख या भटानं कुठून आणला !

पत्र०—अग, अपूर्व वस्तु ह्मणून हा त्यानं राजाला दाखविण्याकरितां आणला असेल!

राजा—मित्रा, मला असं वाटतं, हा त्या चारुगात्रीनें मला लिहिलेला मदनलेख असावा. अर्थ किती खोल, व गीतखंड किती मधुर ?

विदू०—अरे, तूं खंड खंड कायसं ह्मणालास त्यावरून मला श्रीखंडाची आठवण झाली.

राजा—हा मूर्खा अधाशा, श्रीखंड नव्हे, गीतखंड ह्मणजे गीताचे चरण, समजलास!

[कमलपत्राचें चुंबन घेऊन मस्तकीं ठेवितो.]

विदू०—असं असं, मला वाटलं कीं ती तुला श्रीखंडाचीच मेजवानी देणार असेल.

प्रिय०—सखे, मीं मदनलेख लिहून आपला साहसिकपणा दाखविल्याबद्दल महाराज मजवर रागावणार तर नाहींतना ?

पत्र०—अग वेडे, त्यांनीं उलटं त्याचं चुंबन घेऊन त्याला मस्तकीं धारण केलं आहे

राजा—सख्या माधवा, ती गजगामिनी अजून कां बरं येत नाहीं?

पद. (' बहु काम करी हा ' या चालीवर.)

हा मदन मला रे बहु जाळी ॥ धृ० ॥ ती सतत सुंदरी मम हृदयमंदिरीं ॥ करि विहार अंतरीं ॥ जणुं तटिनी कंदरीं ॥ मज चैन नसे या काळीं ॥ रे बहु०॥

काय करूं रे मित्रा?

पद. ('मुझे नादान् तूं है' या चालीवर.)

कधिं पाहिन ती या क्षणीं ॥ हरिणीनयनी, तरुणी, रमणी ॥ धृ० ॥ नच तिस त्यजुनी ॥ सुख मज भवनीं ॥ कांहीं, नाहीं, पाहीं, चैन पडत मन्मनीं ॥ कधीं पाहिन ती० ॥ १ ॥

प्रिय०—पत्रलेखे, या राजाचा विरह पाहून माझ्यानें आतां बाई धीर धरवत नाहीं.

पत्र०—अग, हीच वेळ उत्तम आहे. तर हळूच जाऊन हा हार त्याच्या गळ्यांत घाल. (प्रियदर्शिका तसें करते.)

विदू०—[हार पडल्यावर चपापून] अरेच्या! मित्रा हें रांडलेक सर्पाच्या वेटोळ्यासारखें काय एकदम येऊन तुझ्या गळ्यांत पडलें?

राजा—मूर्खा ही पुष्पमाला! मला वाटतं दुसरी पत्रलेखाच, अशा या हिला अगोदर पुढें पाठवून प्रियेनें आपलें अगमन सूचित केलें असें दिसतें तर माधवा, तूं आपल्या वहिलीला घेऊन ये बरें?

[विदूषक उठून बघण्यास जातो.]

विदू०—अरे वा मित्रा, यमुनेला बरोबर घेऊन जशी गंगा आपला पति जो सागर त्याला भेटण्याकरितां जाते, तशी ही आमची वहिनी अभिसारिकेचा वेष घेऊन या प्रदोषकालीं तुला भेटण्याकरितां सखीसह आली आहे.

राजा—[उठून प्रियदर्शिकेला हातीं धरितो.] अहाहा सुंदरी,-

पद. (' वाटे सर्वथा मुक्त झालों ' या चालीवर.

गेला सर्व तो ताप आतां, ॥ धृ० ॥ पीडि जरि स्मर मला ॥ आज प्रिय जाहला ॥ पावतां सुतनु तव संगमाला ॥ दे आतां गाढ आलिंगनाला ॥ १ ॥

[आलिंगन देतात.]पत्रलेखे, बैस.

पत्रा०—कां महाराज, हा चंद्रिकाप्रकाश आपणाला आतां आनंद देतोना ?

राजा—पत्रलेखे, हें काय विचारावें ?

दिंडी.

जशी चपलेला रुचिर मेघमाला ॥ नेई एकांतीं कांतसंगमाला॥तसें आणितां तूं इथें सुंदरीला ॥ चंद्र कैसा मग तापवी तनूला ॥ १ ॥

विदू०—पत्रलेखे, दहीभात दिला असतां, जसं पिशाच्य शांत होतं तसं याचं मन आतां शात झालं

राजा—मित्रा तूं हिच्या विरहाचीं चिन्हें जीं मला सांगितलीं होतींस, तीं अगदीं बरोबर जुळतात. पहा—

पद. (मालकंस) त्रिवट.

चंदनलेपन अति शीतल हें ॥ अर्पियलें सखिकु-

चयुगुलाला ॥ धृ० ॥ कृशता पसरुनि अंगीं हीचे ॥ पांडुरता ये वदनाला ॥ शरदर्कें जसा केतकितें ॥ तैसा स्मर तापवि सुंदरिला ॥ करुणरसाची मूर्तिच वाटे ॥ विरह व्यथेनें ही मजला ॥ १ ॥

[पडद्यांत] अग कुसुमावती, तो माधवभटजी कुठं आहे मला दाखीव पाहूं.

प्रिय०—[घाबरून] पत्रलेखे, प्रखर विस्तवाप्रमाणें लाल डोळे करून ही राणी संतापलेली दिसते. तर चल लवकर कशी इथून. हे चारुगात्रा, आतां ही दासी आपली आज्ञा घेते.

[राजाकडे पाहत निघून जाते.]

(कुसुमावतीसह राणी प्रवेश करिते.)

राणी—[रागानें] कायग कुसुमावती, आधीं मला माधवभटजी कुठं आहे तो दाखीव. अगोदर त्याचाच समाचार घेतें. तोच मेला लुब्रा या कपटनाटकाचा सूत्रधार आहे.

[दासी मुसक्या बांधते.]

विदू०—[घाबरून] ग्रामदेवतेला जसा प्रथमदर्शनीं बोकड बळी देतात, तसा या राणीचा सगळा राग माझ्यावर दिसतो; तर मित्रा मला वांचीवरे वांचीव !

राजा—अरे असा घाबरतोस कां ? आपण दोघेही त्यांतून सुटून जाऊं असा मी उपाय काढतों.

राणी—अहो महाराज, आपण मोठ्या शिताफीनें हा एकांतवास हुडकून काढलात, पण अखेरीस खरा चोर माझ्या जाळ्यांत सांपडलाच. माझं पाणिग्रहण करतांना

" धर्मेच अर्थेच कामेच नातिचरामि " अशा देव, ब्राह्मण, व अग्नि, यांच्या समक्ष ज्या आणाशपथा वाहिल्यात, त्यांचा हाच उजेड लावलात वाटतं ?

विदू०—राणीसाहेब मी गरीब बिचारा ब्राह्मण आहें. माझ्याकडे कांहीं अपराध नाहीं.

राजा—देवी वासवदत्ते, पुरतेपणीं समजून न घेतां हा भलताच आरोप मजवर काय ह्मणून घेतेस ? हें पहा मी इथें कशाकरितां आलों होतों तें ऐक.

पद—(' जाफते कलंदर या ' चालीवर.)

या मित्रासह रंजन करण्या प्रासादीं मी आलों-गे ॥ सुस्वर गायन सखिसह करितां पाहिली ती नृपकन्यागे ॥ गानें तिच्या वेधुन गेली मति माझी सारी ॥ इतक्यामध्यें एकाएकीं आलि तुझी स्वारी ॥ पायां पडतों देवी तुझ्या कोपूं नको भारी ॥

सारें आपुलें कवटाळ आतां पुरे करा भारी ॥ एकांताचा भंग मीं केला क्षमा करा निर्धारी ॥ माझे सोडून आवडतीचे पाय धरा रणधारी ॥

या माझ्या सुंदरी प्रमादा पदरीं घे संतोषानें ॥ चुकलों आतां न करी ऐसें आलिंगन दे प्रेमानें ॥ १

राणी—पुरे पुरे ही सर्व संपादणी मी पुरती समजलें.

विदू०—बाईसाहेब, हें पहा महाराज, आतां तुमच्या पायां पडले, आतां तरी शांत व्हा !

राणी—गुलामा, खबरदार तूं बोललास तर; असल्या ढोंगाला मी मुळींच फसायची नाहीं.

राजा--हे वासवदत्ते, पुरे हा राग. आतां शांत हो.

राजा-सखये आपुल्या प्रियजनीं कोप नको करूं ॥ सोडुनी सखेग ॥ सकल कोप तो मनींचा ॥ तव अधर स्फुरे हा ॥ त्या योगें ॥ आरक्त नयन होती तेवीं तनु ही कांपते ॥

राणी-पुरे करा कपटस्तुति न करि कपटि नर जात खरी ॥ नृपवग तुह्मां ही निंद्यकृति नच उचित बरी॥

राजा-सुंदरी उगिच कल्पना न करिं मन स्थिर करिं तें ॥ वल्लरी तरुस जशि कवटाळुनि धरि ताशि मातें ॥ सुखवि ये त्वरित सखि आलिंगन मज देउनि तें ॥

राणी- चाल ॥ विषयलंपट तुह्मि गोडि सदा कामीं अती ॥ सुंदर सवत नामि आलिंगना ॥ द्या आलिंगना॥नावडती ही दासी तुह्मां पात्र न आलिंगनासी ॥ होऊन रत तिजशीं सुखें रमा ॥ तुम्ही सुखें रमा ॥

राजा-दूषण हें मजसी ॥ व्यर्थचि कां देसी ॥ अपराधि तुझा तरि विनवीतों परोपरी ॥ सदय होई अंतरीं करी क्षमा ॥ मज करी क्षमा ॥

राणी-विनय करा तिजसी ॥आवडती सखिसी॥ मधुरवच कपटि सवतिच्या मोहासाठीं ॥ समजें मी करिं तुटी उभयजनां ॥ करिं उभयजनां ॥ १ ॥

राणी—माझं नावडतीचं आलिंगन कशाला पाहिजे? आपल्या आलिंगनसुखाची मालकीण दुसरीच होऊन ब-

सली आहे. ठीक आहे. जा ग कुसुमावती, आतांच्या आतां सारथ्याला जाऊन सांग कीं, त्या अवदसेच्या मुसक्या बांधून तिला रथांत घालून घोर अरण्यांत सोडून दे. [कुसुमावती जाते] अहो महाराज, आतां मीं आपल्याला व आपल्या प्रियकरिणीला अखंड एकांतवास करून दिला आहे. तिथें खुशाल तिच्याशीं रममाण व्हा. तिथें श्वापदांखेरिज कोणी देखील आपल्या सुखाचा भंग करणार नाहीं. आतां माझी प्रतिज्ञा अगदीं पूर्ण झाली.

पद (होशिल मग कौसल्यादासी, या चालीवर.)

या विषयी कपटी राजला ॥ निंदुनि अणिला बहु लज्जेला ॥ बांधुनि मुसक्या त्या अवदशिला ॥ धाडिलि वनवासाला ॥ ज्या सटवीनें मम नाथाला॥ मोहीं पाडुनी वेडा केला ॥ सूड तिचा मीं हा उगवीला ॥ जातें कशि आतां ॥ १ ॥

[जाते.]

राजा–(तिच्यामागें धांवत जाऊन.) थांब, थांब, जाऊं नकोस. मित्रा पाहिलंसना? ही रागानें पाय आपटीत निघून गेली. ही कोपिष्ट राणी आपली प्रतिज्ञा खरी केल्याखेरीज कधीं राहणार नाहीं. अखेरीस त्या चारुगात्रीच्या कपाळीं हा वनवास यावाना! हर हर–

पद ['हरिणाक्षी ती प्रिया माझी' या चालीवर.]

बहु आनंदें मज भेटाया आली असतां शशिमुखि बाला ॥ मत्सरभावें कुपित होउनी ॥ देवीनें त्या घाताचे केला ॥ धृ० ॥ मरंदपूरित स्वादु कम-

लिनी ॥ प्राशाया जों मधुकर वळला ॥ इतुक्यामध्यें हिमवृष्टीनें ॥ दूरचि केलें त्या उभयांला ॥ नकळे वनवासा पाठविलें । कीं राणीनें सुंदरिला ॥ १ ॥

[जातात.]

अंक तिसरा समाप्त.

अंक चवथा.

प्रवेश १ ला.

(कष्टी झालेली पत्रलेखा प्रवेश करिते.)

पत्र०—[दुःखानें] हरहर ! देवा ! ! माझी आणि माझ्या प्रिय मैत्रिणीची ताटातूट होईल असं मला स्वप्नीं देखील वाटलं नव्हतं. काय त्या वासवदत्ता राणीचा मत्सरभाव सांगावा? तिनं त्या अनाथ गाईला दूताकडून रथांत घालून एका घोर अरण्यांत सोडून दिलं, आणखी शेवटीं अशा रीतीनं तिनं आपला पण पुरा केलाच. [डोळ्यांत अश्रु आणून] माझ्या प्रिय मैत्रिणीवांचून माझे प्राण आतां खचित रहाणार नाहींत. त्या राजवाड्यांतून मी आपली कशी तरी सुटका करून घेऊन येथपर्यंत आलें. आतां मला या संकटांत त्या यौगंधरायणावांचून कोणी देखील साहाय्य करणारा दिसत नाहीं. तो उदार व दयाळू असून माझ्या प्रेमपाशांत बद्ध झालेला दिसतो. माझं मन त्याच्यावर गेलं आहे हें मात्र मीं त्याला अजून कळूं

दिलं नाहीं. लढाईंत आह्मांला हरण करून येत असतांना वाटेंत त्याची ती त्या वेळची मजविषयींची अभिलाषमुद्रा अजून मला पक्की आठवते. तर आतां त्याच्याकडेसच जावं हें बरं. [साशंक होऊन] बरं, पण मी तिथें गेलें आणि त्यांनीं जर प्रेमकथा काढली, तर कसं करावं बरं? एकीकडून सखीच्या शोधाची इच्छा सोडवणार नाहीं, व दुसरीकडून सेनापतीचा प्रेमपाशही तोडवणार नाहीं. अरे ! पण काय मी वेडी आहें पहा ! त्याची जर खरोखरच मजवर प्रीति असेल तर मी जें जें ह्मणेन तें तें तो ऐकेलच. तर सखीच्या भेटीचीच अट घालून ठेवावी ह्मणजे झालें. मना आतां धीर धर. भगवंता कुसुमायुधा, तिकडे यौगंधरायणाच्या अंतःकरणांत तूं मजविषयीं अशीच प्रेरणा करून ठेव. आई जगदंबे, माझ्या या कार्याला यश दे, एवढंच हात जोडून मागतें.

(पडद्यांत)

"पहिला पहारा हुश्शार."

अगबाई! हा पहारेकऱ्यांचा आवाज ऐकूं येत आहे. तर हाच त्या सेनापतीचा वाडा. आतां आंत जावं.

[जाते]

प्रवेश २ रा.

(यौगंधरायण सचिंत बसला असतांना पडदा उघडतो.)

यौगंध०—

पद. (' जब तेरे सीतम् से ' या चालीवर.)

फसली गोष्ट काय करूं काय करूं आतां ॥ स-

हज जुळूनि योग आला होता ॥ धृ० ॥ सुंदर तो समय पहा ते दिनीं गमवीला ॥ कळुनि वळुनि घात मींच केला ॥ १ ॥

काय करावें बरें ? पत्रलेखा आपणाला प्राप्त कशी होईल या विचारानें माझें मन रात्रंदिवस कसें अस्वस्थ झालें आहे. काय तरी मी वेडा ? विंध्यकेतूशीं तुंबळ युद्ध करून मी विजयी झालों असतां तेच वेळेस महाराजांजवळ जर पत्रलेखेविषयीं मागणी केली असती तर त्याच क्षणीं आमच्या उदार महाराजांनीं ती मला अर्पण केली असती. पण आह्मी आपल्या मनाचा उलट उदारपणा दाखवून महाराजांना ह्मणालों,

[" इतरां जें वच. " ही पूर्वोक्त साकी ह्मणतो.]

याप्रमाणें आपणच आपल्या पायांवर धोंडा पाडून घेतल्यावर मागाहून शोक करण्यांत काय अर्थ आहे ? [आविर्भाव दाखवून] अरे पण माझे बाहू कां स्फुरण पावताहेत ? परचक्राच्या शोधाकरितां मीं आपल्या शकुनी दूताला पाठविला आहेच, तेव्हां या चिन्हाप्रमाणें जर तसाच प्रकार घडून आला, तर सध्यांच्या कार्यभागीं त्याचं मला फारच साहाय्य होईल. कारण तशासारख्या परचक्राशीं टक्कर मारून मी महाराजांना पुन्हा पूर्वीप्रमाणें संतुष्ट करून पत्रलेखेला मागून घेईन.

[इतक्यांत एक शिपाई येतो.]

शिपाई–सेनापतिमहाराज, सेनानिवेश पहाण्याची वेळ झाली, तर महाराजांनीं चलावें.

यौगंध०—माझें मन आज स्वस्थ नसल्यामुळें सेनानिवेश पाहण्यास माझें येणें आज होत नाहीं. सबब तो तुह्मीच पहा असें विजयसेनास जाऊन सांग.

शि०—जशी महाराजांचीं आज्ञा. (जातो.)

यौगंध०—[आपल्याशीं] बिचाऱ्या यौगंधरायणा, तूं ऐवढा रणयोद्धा असतांना पत्रलेखेसारख्या अबलेनें तुला अगदीं निर्बळाहून निर्बळ करून सोडावेंना?

(इतक्यांत शकुनी दूत येतो.)

शकुनी—सेनापतिमहाराजांचा विजय असो.

यौगंध०—वाहवा! दूता तूं आलास? परचक्राचें काय वर्तमान आहे?

शकुनी—सेनापतिमहाराज, आपण दैववान् खरे. आपलें कार्य अगदीं फत्तें झालेंच असें समजा. धर्मारण्यांत राक्षसांनीं धौम्यऋषीला व इतर तापसांना अत्यंत गांजून सोडलें आहे, ह्मणून राक्षसांच्या संहाराकरितां धौम्यऋषींनीं दोन ऋषिकुमारही आपल्या वत्सराजमहाराजांकडे पाठविले आहेत. हा सर्व वृत्तांत मीं गुप्त वेषानें संचार करून काढला.

यौगंध०—[आनंदानें] वाहवा! वाहवा!! माझा मनोरथ आतां खास सिद्धीस जाणार. आतां त्या राक्षसांच्या संहारासाठीं मीच महाराजांच्या आज्ञेनें जातों, व आपला बहुपराक्रम दाखवून त्यांना संतुष्ट करून पत्रलेखेला हां हां ह्मणतां आपलीशी करतों! [तरवार पाजळून]

पद--(' बिन सिके न है ' या चालीवर.)

आलें मला आतां अवसान ॥ दाणादाण हाणाहाण रानोरान करिं जाण ॥ मला आतां० ॥धृ०॥ जिवलागि पत्रलेखा प्रिया प्रिया प्रिया ॥ तिजसाठीं खटाटोप सारा वांया वांया वांया ॥ तिजवांचुनी निदान माझे प्राण जाती जाण ॥ माझी काया तिचे पायां वाहिली मीं याच ठायां ॥ थोर जिची माया माया पत्रलेखा प्रिया प्रिया ॥ दाणादाण हाणाहाण

बरं दूता, सैन्यांत जाऊन सर्व सैनिकांना हुशार राहण्यास सांग.

शकुनी--ठीक आहे. [मुजरा करून जातो.]

यौगंध०-माझा मनोरथ आतां खरोखरच सिद्धीस जाणार काय? पत्रलेखेच्या प्राप्तीसाठीं मला हा केवढा तरी व्यूह रचावा लागत आहे ?

(एक पहारेकरी प्रवेश करितो.)

पहारे०-सेनापतिमहाराज, बाहेर एक स्त्री आली आहे व ती आपणास भेटूं इच्छिते.

यौगंध०-काय ? स्त्री ? व माझी भेट घेऊं इच्छिते ? हें काय गूढ असावें बरें ? ही पत्रलेखा तर नसेलना ? पण ती येथें कशी येणार ? राणी वासवदत्तेनें तर तिला बंदिखान्यांत टाकिली आहे. असो; बरं दूता, तिला आंत पाठवून दे. [पत्रलेखा हळू हळू पावलें टाकीत येते.]

[यौगंधरायण तिजकडे पाहून] अहाहा ! धन्य मी! हीच ती पत्रलेखा!! काय? मी स्वप्नांत तर नाहींना? छेः छेः! खरोखर हीच ती.

पद-(राग- वसंत.)

नव तारुण्यें ही मुसमुसली ॥ नितंबभारें कोमल कटितें पीडुनि गति कुंठित केली ॥धृ०॥ करुनि सखीस्तव अति शोकाला ॥ वदन हिचें धरि पांडुरगाला ॥ अंगीं यौवनभर संचरला ॥ पुष्पित जणुं माधवि झाली ॥ तारुण्यें० ॥ १ ॥

पत्र०-[आपल्याशीं] हा मला आपल्या प्रेमपाशांत बद्ध करण्याला पहातो आहे. परंतु प्रथमच याच्या प्रेमपाशांत न गुंततां जेणेंकरून प्रियसखीची भेट लवकर होईल अशा रीतीचें वचन याजकडून घेतलं पाहिजे. म्हणून याचं प्रेमाचं बोलणं मोठ्या युक्तीनं उडवून टाकिलं पाहिजे.

[उघड] सेनापतिमहाराज, आपण आपल्या महाराजांप्रमाणेंच मोठे उदार, पराक्रमी आणि दीनाचे कनवाळू आहांत, असं समजून मी आपल्याकडे कांहीं याचना करण्याकरतां आलें आहे, तर त्याची माफी असावी.

यौगंध०—पत्रलेखे, असें अगदीं मनांत आणूं नकोस. तुझी याचना ऐकण्याचें तरी माझें मोठें भाग्यच म्हणायाचें; कारण, या यौगंधरायणानें आजपर्यंत एका असिधारेखेरीज कोणत्याही स्त्रीचा पक्षपात केला नाहीं. त्रिजगताकाही जिंकणाऱ्या कामदेवाच्या पाशांत मी अखेरीस सांपडलों.

तर पत्रलेखे, तूं जें जें म्हणशील तें तें करण्यास मी अगदीं सिद्ध आहें.

पत्र०—[आपल्याशीं] याच्या या विषयपटु भाषणांनीं जरी मला मोह उत्पन्न होतो, तरी शेवटपर्यंत आपण याला थांग लागूं देऊं नये हेंच बरं. [उघड] आपण खरोखरच कुमारकार्तिकेयासारखें ब्रह्मचर्यव्रत पाळून खड्गलतेशीं एकपत्नीव्रत चालविणारे क्षात्रधर्मनिपुण आहांत, हें सर्वविश्रुतच आहे.

यौगंध०—[आपल्याशीं] अरेरे ! या चतुरेनें तर माझ्या भाषणाचा ओघ अगदींच बदलून टाकला. तर आतां हिच्याच अनुरोधानें चालावें हें बरें. [उघड] पत्रलेखे, तुझें काय काम आहे तें मला निःशंकपणें सांग. माझें तुला पूर्ण आश्वासन आहे.

पत्र०—महाराज, माझी प्रियसखी प्रियदर्शिका हिला राणी वासवदत्तेनं—

यौगंध०—हर ! हर ! ! तुझ्या प्रियसखीला वनवास भोगावा लागला, हा वृत्तांत मला कळून चुकला आहे, व म्हणून आपल्या सखीच्या विरहानें तूं अत्यंत कष्टी झाली आहेस ही गोष्ट तुझें हें म्लान वदनच सांगत आहे. पत्रलेखे, प्रियजनाचा वियोग कोणाला बरं दुःसह होत नाहीं ? उदाहरणार्थ माझीच स्थिति पहा—

पद—(सुविहित जाहलें ' या चालीवर.)

आजवरि जरि मीं . समरिं शतांहुनि शत रिपु

बधिले या खड्गानें ॥ धृ० ॥ परि तव विरहें सुंदरि मजला पीडुनि तव गे दासचि केलें ॥ आज० ॥

पत्र०—[लाजून] त्या चांडाळ विरहानं आपलीज्या-अर्थीं अशी स्थिति मजकरितां केली आहे, त्याअर्थीं आपल्या चिरसहवासांत राहण्यास मीही फार उत्सुक आहें. परंतु अगोदर प्रियसखीची व माझी भेट झाल्याखेरीज मी कोणतेंही अभिवचन देणार नाहीं.

यौगंध०—इतकेंचना ? ठीक आहे.

पद–(शंकराभरण)

पत्रलेखे तुला बैसवूनी रथीं रक्षकासहित मी पाठवीतों ॥ जाउनी काननीं प्रियसखी शोधुनी राहिं तेथें सुखें धौम्यसदनीं ॥ वत्सभूपाचिया अनुमतें त्याच वनिं असुरगणखंडना त्वरित येतों ॥ गाढ आलिंगना दे आतां सुंदरी भेट तुजला पुन्हां त्वरित देतों ॥ पत्र० ॥ १ ॥

(जातात.)

प्रवेश ३ रा.

(गोंद्या, सटव्या व कांहीं गुराखी प्रवेश करितात.)

गोंद्या—अर सटव्या, ए सटव्या, ग्योका हाकड ये की बेगी बेगी.

सटव्या—कार गोंद्या कशापायीं र वराड वराड वराडतुयास ?

गोंद्या—आर ग्योका ह्य बग, संमदीं ह्मसरं नदीमंदीं

बसल्यात, आन् गाई बग त्या पल्याडल्या डुंगरावर चरत्याती, तर ये मर्दा वाइंच यां आमराईत बसुनशेनि गानं गाऊं या. [इतक्यांत दारू प्यालेला ह्मशा येतो.]

सटव्या—आर गोंद्या ह्यो बग ह्मशा कसा झिंगून आलाया! कार ह्मशा, आज लई शिंदीवर हात मारलाया, थू ल्योका, समदी घान वरडाग सुटलिया तुझ्या त्वांडाला.

[नाकें मुरडतात.]

गोंद्या—खरच कीर सटव्या!

ह्मशा—ह्य बग मर्दा, आज माझ्या कारभारनिनं मायंदळ शिंदी हंग मला पाजली. त्ये जाउं दे ल्योका, पन वाइंच हथ बसून गानं गाऊं या. [गाऊं लागतात]

गाणें (कालीयमर्दनाचें.)

लई थोर यमुनेचं तीर ॥ तिचं पानी काळंभोर ॥ वाळुचं काळं वाळवंट ॥ लई झाडी हिंगनबेट ॥ थत समद् मिळुन गोपाळ ॥ खेळतो नंदाचा बाळ ॥ आला पेंद्या मंग वरडत ॥ वाकड्या आला लंगडत ॥ आल्या समद्या गोपि बिगीबिगी ॥ ठकु साळु आवडी भागी ॥ लगुरिचा मांडिला डाव ॥ खेळे भारी यादवराव ॥ कोनि कुरं घोडि चौपाई ॥ कोणि खेळति लंगडशायी ॥ कुनि हमामा घाली हमामा ॥ जय कुस्न बोलती नामा ॥ खेळती मंग इटिदांडू ॥ यकमेकां मारती चेंडू ॥ गेला भिरिरि चेंडु कुस्नाचा ॥ टोमना दिला दांडुचा ॥ कुसनाचा चेंडु मंग गे-

ला ॥ काळिया डुहामधिं पडला ॥ कालिया सरप लई मोटा॥यमुनच्या डुहामधिं होता ॥ काळिया आला धांवून ॥ कुसनास धरी जाऊन ॥ तो धरुन मंग जगजेठी ॥ नाचला तयाच्या पाठी ॥ करुन काळियाचं मरदन ॥ श्रीकुस्न आला परतून ॥ १ ॥

(नंतर पत्रलेखा येते.)

पत्र०–वाटेच्या श्रमामुळें शिपाई लोक विश्रांति घेताहेत तोंपर्यंत या गुराख्यांना सखीबद्दल माहिती विचारावी.

गोंद्या–कार ह्मशा, त्ये काय दिसतया र? ल्योका भूताटकीन र भूताटकीन. अर ह्य बग हकडच येतीया.

सटव्या—अर थू ल्योका मुर्दाडा! अर ती कोनी आस्तुरी हाये आस्तुरी, ह्य बग काळ लुगड नेसलीया अन पायांत तोड बी घातल्याती.

ह्मशा–गोंद्या खरच कीर कुनी बायकु हाय इच भन धरा इला. काय बघताया?

गोंद्या—[पुढें येऊन]

लावणि (' कंगनीदार भरजरी ' या चालीवर.)

बिजलिगवानी लई चमकतिस कोन है तुझा धनी ॥ अशी फाकडी नार सोभाशिल राजाचि रानी । कशापायि हरनाचि छबकडी आलिस या रानीं ॥ बघुन तुला लंइ सुटलं आमुच्या त्वांडाला पानी ॥१॥

सटव्या—

लावणी- (चाल सदर.)

हो कार्भारिन माझि नेतुया तुला ग माझ्या

घरीं ॥ गोजिरवानी लहान ठेंगनी दिसतिस तूं नारी॥ग्वाड लई हुलग्याच माडग खाउन कर न्हेरी ॥ नथ झुपक्याची घेतों तुला ग पातळ जरतारी ॥१॥

पत्र०–[स्वगत] हे लोक अगदीं रानटी असून फारच आडदांड दिसतात. तर त्यांच्या हातून आपला अपमान होण्याचा संभव आहे. (उघड मोठ्यानें हांक मारिते) वीरसेना, अरे वीरसेना, लवकर धांवत ये. (वीरसेन येतो व त्यास पाहून सर्व गुराखी घाबरतात.)
बाबांनो, या वाटेनें एखादा रथ जातांना तुम्हीं पाहिलात कां ?

सर्व गु०—न्हाइ, न्हाइ, बामनिन.

पत्र०- ! हरहर माझ्या प्रियसखीचं काय बरं झालं असावं ? आतां तिचा शोध तरी कुठं लागेल ? बाबांनो या अरण्यांत कोणाचा आश्रम तरी आहे का ?

झशा—व्हय. व्हय. त्या आस्रमामंदी बगा योक लाब दाडीचा बामन न्हातुया. कार गोंद्या त्येच नांव काय?

सटव्या—त्येच ? व्हय. व्हय. काय गड्या ? हं हं हं धौम्या म्हनताती त्येला.

गोंद्या–हंग व्हय त्येच.

पत्र०—बाबांनो, तर चला आम्हांला त्या आश्रमाकडे नेऊन पोंचवा.

सगळेजण— व्हय, हकडून आमच्या पाठुपाठ या बामनिन बया. (सर्व जातात.)

प्रवेश ४ था.

(कंचुकी प्रवेश करितो.)

कंचुकी—इकडे तर ऋषिकुमार निरोप घेऊन आले आहेत, व इकडे आमचे महाराज तर राज्यकारभार सगळा टाकून देऊन विरहानें वेडेपीर बनले आहेत- त्यांतून आणखी असें ऐकलें कीं राणीला मत्सरभाव सहन न होऊन तिनें त्या राज्यकन्येला अरण्यांत सोडून दिलें. यानें तर त्यांच्या शोकसागराला जास्तच भरती आली आहे. काय त्याची अलीकडे दशा झाली आहे पहा—

पद. (' वसंती बघुनी ' या चालीवर.)

सुखानें झोंप न कधिं घेती ॥ शयनावरि लोळुनियां तळमळ तळमळ बहु करिती ॥ मृगया टाकुनियां देती ॥ उदासीन होउनियां क्रीडासौधावरि बसती ॥ पदोपदीं मूर्च्छित कीं होती ॥ कोकिलकूजित ऐकूनि कुंजीं अति विव्हल पडती ॥ त्यांची हीच असे रीती ॥ अंतःपुर सोडुनियां रजनी विरहें घालविती । १ ॥

तर आतां शून्यहृदय झालेल्या आमच्या महाराजांना ऋषिकुमाराचा निरोप कसें तरी करून कळविला पाहिजे.—

[जातो.]

(वेत्रवती व राजा प्रवेश करितात.)

वेत्र०—इकडून असें यावें महाराज.

राजा—वेत्रवती, इथें सध्यां फार उष्मा होत आहे, तर पुष्पवाटिकेचा मार्ग दाखीव.

वेत्र०—ठीक आहे सरकार, असें यावें; हा पहा आपला चिमणबाग.

राजा—वेत्रवती, हें शांतिस्थान पाहिल्याबरोबर मला किती तरी विसावा आला सांगूं.

पद—(' नभ मेघांनीं आक्रमिलें ' या चालीवर.)

किती शीतल हा वायु वाहे ॥ उदासता मम जो हरिताहे ॥ धृ० ॥ नाजुक लतिकांना डोलवुनी ॥ नव कुसुमांचा सुगंध लुटुनी ॥ निदाघमन्मथतापा हरुनी ॥ मम गात्रांना सुख देताहे ॥ १ ॥

वेत्र०—महाराज, या माधवीलतामंडपाखालीं स्फटिकाचा चौरंग आहे.याजवर बसून महाराजांनीं विश्रांति घ्यावी.

राजा—बरें तर तसेंच करूं या. [बसून श्वास सोडून] वेत्रवती, दुःखी जनाच्या पुढें दुःखें कशीं हात जोडून उभीं असतात. पहा.

साकी.

सुरभि जातिपुष्पांचा कामोद्दीपक परिमल आला॥ मत्कामातें प्रदीप्त करूनी बोधितसे सखिस्मृतीला ॥ याच्या योगानें । झालीं चंचल मम भानें ॥ १ ॥

वेत्र०—महाराज, हे वृक्ष पहा, लतारूपस्त्रियांबरोबर कसे आनंदानें वास करीत आहेत.

राजा—वेत्रवती, हें काय असेल बरें ? या सुकुमार नवमालिकेला पाहिल्याबरोबर मला वाटतें कीं ती चारुगात्री वनांतून येऊन मजपुढें उभी राहिली आहे.

पहा—

पद—(' सुवर्ण केतकी ' या चालीवर.)

वाटे शाखा नव्हत या परी बाहुयुगल त्या रमणीचा ॥ किसलयरागा अवलोकीतां ओष्ठचि भासे तन्वीचा ॥ भ्रमरसमूह न असे खरा कीं केशपाश हा नील तिचा ॥ कुसुमांचा हा बहर नवतिचा वाटे भर तारुण्याचा ॥ भ्रमरमिषें वाटे कीं मजसी बोल बोलते प्रेमाचा ॥ लतारूपिणी प्रिया उभी ही सत्यचि होई ग्रह मतिचा ॥ वाटे० ॥ १ ॥

वेत्र०—महाराज ही लता आहे.

राजा—हरहर ! वेत्रवती, इतका वेळ मी काय आनंदांत होतों पहा—

पद—(' मजजवळि उभी ती बाला ' या चालीवर)

भासली मला तरुणी ती ॥ मजपुढें उभी गे होती जणुं वदत मजासि ती होती ॥ सुखशैलिं करीं मी वसती ॥ चाल ॥ या ऐन अशा समयाला ॥ घात तूं केला ॥ देउनि स्मृतिला ॥ ठरविलेंस हिस लतिकेला ॥ या ऐन अशा समयाला ॥ भासली० ॥

वेत्र०—महाराज, आपणासारख्या धनुर्धारी वीरांनीं धीर सोडूं नये. किती जरी मोठा वारा सुटला तरी मेरु पर्वत कुठें डगमगला आहे का ?

राजा—

पद—('दैवयोगदुर्विपाक ' या चालीवर.)

झडकरि ये शशिवदने भेट दे मला ॥ तव विरहें

व्याकुल हा देह जाहला ॥ धृ० ॥ मूर्ति तुझी हृदयांतरिं चारु कोंदली ॥ त्वदधरमधुपानतृषा फार लागली ॥ मदनशरें मम गात्रें विकल जाहलीं ॥ तव शशिमुखदर्शनार्थ जीव शोषला ॥ १ ॥

[मूर्छित होतो.]

वेत्र०---महाराज, सावध व्हा, सावध व्हा. [आपल्याशीं] प्रियजनाचा विरह महाराजांना अजूनही पीडा देत आहे. [राजा हळूहळू सावध होतो.]

[इतक्यांत कंचुकी प्रवेश करितो.]

कंचुकी---महाराज, परमहंस धौम्यऋर्षींनीं आपणाकडे दोन ऋषिकुमार कांहीं निरोप देऊन पाठविले आहेत.

राजा---वाहवा! काय? धौम्य महर्षींकडून आले आहेत? बरें तर वैनतेया, जा आणि आपल्या माणवक पुरोहितांकडून त्यांचें आदरातिथ्य करून त्यांना अग्निशाळेंत प्रविष्ट कर. मीही लवकरच येतों.

कंचुकी---आज्ञा महाराज. [निघून जातो.]

राजा---वेत्रवतिके, मी ऋर्षींचा प्रसाद घेऊन येईपर्यंत तूं देवघरांत जाऊन माधवाचा संध्यापूजनविधि आटोपला असल्यास त्याला मीं बोलावलें आहे म्हणून सांग. चल तर, मला होमशाळेचा मार्ग दाखीव.

वेत्र०---असें इकडून यावें महाराज.

[जातात.]

....

प्रवेश ५ वा.

[स्थल होमशाळा.]

[मंदाक्ष व गालव दोघे ऋषिकुमार प्रवेश करितात.]

मंदाक्ष—मित्रा गालवा, तो राजर्षि अद्याप होमशाळेंत कां बरें येत नाहीं ?

गालव—मंदाक्षा, अरे या राजेलोकांना राज्यकारभारामुळें क्षणभर देखील विश्रांति मिळत नाहीं. बहुतकरून तो दयाळू वत्सराजा धर्मासनावरून उठून इकडेच येत असावा.

मंदाक्ष—गालवा, मला ही कौशांबी नगरी केवळ अमरावतीच वाटत आहे. जसा त्या अमरावतींत महेंद्र राज्य करतो, तसाच या कौशांबी नगरींत हा महाबाहु वत्सराज शोभतो. काय या राजधानीची शोभा ! माझे तर डोळे अगदीं दिपून गेले.

गालव—मंदाक्षा, तसेंच या राजाच्या होमशाळेंत हा वेदघोष कसा एकसारखा चालला आहे. पहा मला वाटतें हा राजा सर्व राज्यकारभार संभाळीत असून देखील तपस्व्यांसारखाच संयमी आहे. [पडद्याकडे पाहून]

मंदाक्ष—गालवा, हा पहा चतुःसमुद्रवलयांकित पृथ्वीचें पालन करणारा वत्सराजा नम्रवेषानें होमशाळेंत येत आहे.

(राजा प्रवेश करितो.)

राजा—आपणा उभयतांना मी अभिवादन करितों.

दोघे—[वर हात करून]

दिंडी (लीलांबरी.)

राजलक्ष्मी शत वर्ष भोगुनीयां ॥ विजय संपादीं बाहुबलें राया ॥चक्रवर्ती सुत तुला प्राप्त होवो ॥ ईश तुजला बहु मंगलास देवो ॥ १ ॥

राजा—ऋषिमहाराज, आपले प्रथमाश्रमी भगवान् धौम्य ऋषि कुशल असून आपल्या तापसक्रिया निर्विघ्न चालल्या आहेतना? [मध्येंच घाबरून] अरेरे!

साकी—

हिमक्लिष्ट नक्षत्रें तैशीं निस्तेज हिं मुनिवदनें ॥ पाहुनि मजला वाटे पीडित होइ तपोवन विघ्नें ॥ संशय मनिं येतो ॥ पहावें सत्य होइ का तो ॥ १ ॥

मंदाक्ष—राजा, कसलें कुशल विचारतोस? भगवान् धौम्यगुरूंनीं तुला अशी विज्ञप्ति केली आहे कीं—

पद— (‘ निज मख रक्षाया ’ या चालीवर.)

शशिकुलदीपा सदया येईं त्वरेनें ॥ वत्सपतिभूपाला ॥ येईं० ॥ शरण तुला मी दीन रिघालों ॥ रक्षण करिं या संकटकाला ॥धृ०॥ राक्षस हे छळिती ॥ गांजीती ॥ हाल किती करिती ॥ तम दिनमणि हरी उज्ज्वल किरणीं ॥ नाशी तेंवि तपोविघ्नांला ॥ १ ॥

गालव—पद— (चाल सदर)

शशिकुलवीरवरा उदारा ॥ ऋषिजनमोदकरा ॥ दीन आह्मां हे दानव ग्रासिती ॥ जलदापरि करिं सुखवृष्टीला ॥

राजा--हा दुष्ट मदांधानो, आतां पहा तुह्मांला नाहीं-सें करून टाकतों. ऋषिमहाराज, आपण कांहीं विशेष काळजी करूं नये.

मंदाक्ष–राजा,

(दिंडी—लीलांबरी.)

साह्यकर्ता तूं असुनि महेंद्राचा ॥ विघ्न नाशाया बली कोण साचा ॥ सृष्टितिमिरातें प्रथम हरायार्थ ॥ अरुणवीराविण अन्य नच समर्थ ॥ १ ॥

गालव—हे महाभागा, तूं महेंद्राहून कांहीं कमी नाहींस पहा–

पद–(' शशिकुलभूषण गुणवंता ' या चालीवर.)

जो तूं जगता सुखधामा ॥ वर्णूं काय तुझा महिमा ॥ वासव सुरलोकीं जैसा महिवरि राज्य करिसि तैसा ॥चाल॥ सागरवसना अवनीच्या तूं ॥ संचितसद्धर्मा ॥ भर्ता शोभासि शुभकर्मा ॥ १ ॥

राजा–ऋषिवर्य, मी या स्तुतीला मुळींच पात्र नाहीं.

दोघे–राजा, हा विनय तुझ्या कीर्तीला फारच शोभतो.

राजा–ऋषिवर्य, आतां स्वस्थ असावें.

साकी.

रणीं वधिन निजबाहुबलानें मी त्या असुरगणाला ॥ ते दिनिं देइन विश्रांतीतें धनुच्या प्रत्यंचेला ॥ आश्वासन घ्यावें ॥ कांहीं भय नच मानावें ॥ १ ॥

दोघे—हे राजा, आतां तुला शेवटचें इतकेंच सांगणें आहे कीं–

पद ('येतसे मधुर ध्वनी' या चालीवर.)

येवोनि आमच्या वनीं ॥ राजा धनुर्बाणीं ॥ व-धुनी टाकी ॥ रिपूंना ॥ धृ० ॥ बहु आम्हां त्यांनीं गांजियलें ॥ जीव आमुचे नकोसे केले ॥ गुरु धौम्य बहू घाबरले ॥ ये तपोवनीं॥राजा धनुर्बाणीं॥वधु० १

राजा— पद–चाल सदर.

शर धनुतें पहा लावीतों ॥ असुरांचे बळी पाडीतों आपणां सुखशांती देतों ॥ जा तपोवनीं ॥ आपुल्या मागोनि ॥ येतों ॥ पहा मी त्वरेनें ॥ १ ॥

मंदाक्ष—राजा, आम्ही आतां तपोवनाला जातों, तूं लवकर ये.

राजा—ऋषिवर्य, त्या आपुल्या पुण्याश्रमपदांत मीं आपलें धनुष्य सज्ज करून लवकरच येतों पहा.

दोघे—ठीक आहे. जातों तर. तुझा विजय असो.

(ऋषिकुमार गेल्यावर विदूषक येतो.)

विदू०—हा पहा माझा मित्र होमवेदिकेजवळ उभा आहे. तर आतां त्याच्याजवळ जावें. मित्रा तुझा विजय असो.

राजा—महाब्राह्मणा, आलास, तुझें कुशल आहेना ?

विदू०—होय, पण नुकतेंच येऊन गेलेल्या ऋषिकुमा-रांनीं तुजवर कोणता अनुग्रह केला ?

राजा—हा प्रश्न तूं करशील असें मला आधींच वाटलें होतें. [खेदानें] मित्रा काय सांगूं ? मी पापकर्मा अस-ल्यामुळें देवशत्रु जे दानव त्यांनीं तपोवनवासी ऋषींचे

नाना छळ मांडिले आहेत, व याकरितांच धौम्यऋषींनीं ऋषिकुमार मजकडे पाठविले होते; समजलास.

विदू०—[स्वगत] याचें मन त्या पिशाचिकाव्याधीनें जरी घेरून टाकलं आहे, तरी प्रजापालनीं याची केवढी ही तत्परता ? [उघड] मित्रा, अरे ऋषींवर संकट आल्यामुळें तूं आपल्या स्वतःला काय म्हणून दूषण लावतोस ?

राजा—अरे ऐक—

साकी—

काला कारण सर्वथैव ते भूपति सततचि असती ॥ ऐसे पूर्वज स्मृतिमद्दषिजन । निजलेखांतीं लिहिती ॥ नमुनि तयां भावें । वच तें सत्यचि मानावें १

विदू०—मी तर असें समजतों कीं असें लिहिणारे ते लांबलांब दाढीचे सारे ऋषी शुद्ध लपुटशंख सोटभैरव होते. त्या वेड्या गांवढळांनीं कांहींतरी लिहून ठेवलें आहे, झालें.

राजा—मित्रा, त्या पुण्यराशी ऋषींचा उपहास करूं नकोस.

विदू०— तर मग आंपला विजयरथ आतांच सिद्ध होणार कीं काय ?

राजा—होय, कोण आहेरे तिकडे ? शूद्रका सारथ्याला आमचा विजयरथ सिद्ध करून आणण्याला सांग, व साऱ्या अंतःपुरांत जाऊन खबर दे कीं, शत्रुपारिपत्यासाठीं आह्मी आतांच सैन्यासह कूच करणार, व

सेनापतीलाही मजकडे पाठवून दे. [पडद्यांत " जी सरकार "] [विदूषकास] कां माधवा, आमच्याबरोबर तपोवनाला येण्याची इच्छा आहे का?

विदू०—[भयानें] छे! छे! नकोरे बाबा. त्या ऋषीराक्षसांच्या युद्धाला इथूनच माझा कोपरांपासून नमस्कार असो. हें पहा मित्रा. यज्ञांत बोकडाला जसें बुकलून बुकलून मारतात; तसें ते बटकीचे राक्षस माझे हाल हाल करून मला मारून टाकतील. मग या गरीब ब्राह्मणाला फिरून घृतकल्या मधुकल्या दुसऱ्या जन्मीं कुठून मिळतील? तुलाही चार शब्द सांगावयाचे आहेत. ऐकशील तर—

राजा—हो हो. जर सयुक्तिक, ऐकण्यासारखे असतील तर ऐकेन. सांग.

विदू०—अरे, हें पहा त्या ऋषिराक्षसांच्या भांडणांत पडून काळकूट विषासारख्या युद्धाचा विनाकारण खटाटोप कशासाठीं करतोस? मरेनात ते ऋषी आणि राक्षस!

आयतें चांदणें टाकून देऊन मुद्दाम रखरखीत उन्हांत जाण्याची बुद्धि तुला कोठून झाली बाबा?

राजा—अरे, असें पहा—

पद—(' पार्था तुज देउनी ' या चालीवर.)

तपाचा षष्ठभाग देती॥ म्हणुनी तत्सेवक भूपती ॥
सकला जगतावरि करिती॥ अनुग्रह पुण्यतपोमूर्ती॥
गूढतपोबल ते असती॥ वरुनि जरि शमधन दिसती॥
तद्रक्षण कां न करावें॥ विमल यशा कां मळवावें॥
पुण्य तपोमूर्ती॥ म्हणुनी०॥ १॥

विदू०—तुझा जर जाण्याचा आग्रहच असेल तर, बरेच दिवस पुरेल असें फराळाचें तरी बरोबर घेऊन जा. नाहीं-तर तेथें गेल्यावर ऋषींच्या आश्रमांत नवीन प्रसूत झालेल्या हरिणीसाठीं शिजविलेल्या नीवारपाकाचा चतुर्थांश भक्षण करून तुला रहावें लागेल. त्या बेट्या डोकीला हिंगणबेटाचें तेल माखणाऱ्या, वारा खाऊन पाणी पिणाऱ्या दिगंबर ऋषींजवळ दुसरें काय मिळणार ?

राजा—[हंसून] वाहवा, केवढी तरी मोठी काळजी ? बिचाऱ्याला स्वताला जसें अन्नमय जग दिसतें, तशीच सर्वत्रांची स्थिति समजतो झालें.

(एक दासी प्रवेश करिते.)

दासी—महाराज, आपण तपोवनांत जाणार असें राणीसाहेबांना समजल्यावरून त्यांनींही आपल्याबरोबर येण्याचा निश्चय केला आहे. तर महाराजांची काय आज्ञा आहे ?

विदू०—मित्रा, ही साडेसाती तुझ्या मागें पक्की लागली समज.

दासी—कां, भटजीबुवा, तुमची जीभ एवढी वळवळ कां करिते ? ही राणीसाहेबांची निंदा त्यांना जाऊन सांगूं वाटतं. मग मात्र मेल्याचं चांगलं कांडात् निघेल !

राजा—चतुरिके, देवीला जाऊन कळीव कीं, तुम्हां-सारख्या नाजुक स्त्रियांना युद्धपरिश्रम कशाला पाहिजेत ? त्यांतूनही जर राणीची समरकर्म पाहण्याची इच्छा असेलच तर आमच्याबरोबर रथांत बसून चलावें, असें सांग जा.

दासी—जशी महाराजांची आज्ञा. (जाते.)

विदू०-मित्रा, राणीचा तुजबरोबर येण्याचा खरा मतलब समजलास का?

राजा-खरेंच नाहीं समजलों, सांग बरें.

विदू०-अरे, हें पहा. ऋषिकार्याचें निमित्त करून तूं प्रियदर्शिकावहिनीच्या शोधाकरितां अरण्यांत जात असशील म्हणून ही बरोबर येण्याची तिनें युक्ति काढली.

राजा-हा मूर्खा, या युद्धप्रसंगीं ही प्रेमकथा काढण्याला तुला लाज कशी नाहीं वाटत?

विदू०—अरेरे, हें काय लचांड झालें? [पडद्यांत घंटेचा आवाज होतो] अरे मित्रा, या घंटेच्या घणघण आवाजावरून तुझा रथ सज्ज झाला वाटतें.

राजा—ठीक आहे तर,

ओंवी.

माझा कोदंड सज्ज करितों ॥ सकलां राक्षसां बळी पाडितों ॥ दीन ऋषींचे प्राण रक्षितों ॥ प्रत्यंचा पहा झाडिली ॥ १ ॥

(इतक्यांत यौगंधरायण घाईघाईनें येतो.)

यौगंध०—हां! हां!! महाराज, आज एकाएकीं असें धनुष्याचें विस्फारण करून प्रत्यंचा झाडण्यासारखा कोणता दुर्धर प्रसंग महाराजांवर आला आहे? हा दास सेवेस तयार आहे.

राजा—यौगंधरायणा, ब्रह्मारण्यवासी ऋषींना राक्षसांनीं फार गांजलें आहे, तर त्यांच्या विध्वंसासाठीं धौम्य महर्षींच्या आज्ञेवरून मी हा आतांच चाललों.

यौगंध०—महाराज, जोंपर्यंत आपल्या पिंडानें पुष्ट झालेला हा यौगंधरायण आपणाजवळ आहे, तोंपर्यंत शत्रु-पारिपत्याचे आपणास वृथा श्रम कशाला? आज्ञा होण्याचा मात्र उशीर, कीं हा मी दुष्टांचा समाचार घेण्यास एका पायावर सिद्ध आहें.

विदू०—अरे मित्रा, या गेलेलट्टालाच जाऊंदे एकट्याला कसा. हं. परस्परं समर्पयामि!

राजा—यौगंधरायणा, ज्याअर्थी भगवान् धौम्य ऋषींची प्रत्यक्ष मला आज्ञा झाली आहे, त्याअर्थी या प्रसंगीं मला गेलेंच पाहिजे .

यौगंध०—निदान स्वामिचरणांबरोबर येण्याची तरी मला आज्ञा व्हावी.

राजा—ठीक आहे युद्धांत मला तुजपासून बरेंच साहाय्य होईल, तर मजबरोबर चलावें.

यौगंध०—हा मी स्वामींबरोबर येण्यास सिद्ध आहें. [आपल्याशीं] पत्रलेखेला वचन दिल्याप्रमाणें धर्मारण्यांत जाण्यांचा बेत तर सुदैवानें एकदाचा जुळलाच. यावरून माझा मनोरथ सफळ होणार असा आशांकुर मनांत उद्भवतो. [उघड] महाराज, आयुधागारांत जाऊन मी सशस्त्र होऊन प्रवासास सिद्ध होतों.

राजा—ठीक आहे. [यौगंधरायण जातो.]

विदू० मित्रा, तुझा विजयरथ केव्हांपासून सिद्ध होऊन दारीं उभा आहे. तर आतां उशीर कां ? तुझा विजय असो. ऋषींचा प्रसाद घेऊन लवकरच परत ये.

राजा—ठीक आहे. माधवा,

साकी.

तपोवनाप्रति जातों आह्मी रक्षोगणसंहरणीं ॥ ऋषीजनांचें इष्ट करोनी येउं त्वरें परतोनी ॥ तोंवरि तूं सदनीं ॥ रहावें न करी खेद मनीं ॥ १ ॥

[जातात.]

अंक चवथा समाप्त.

अंक पांचवा.

प्रवेश १ ला.

(गालव व मंदाक्ष प्रवेश करितात.)

गालव—मित्रा मंदाक्षा, आज एवढ्या घाईघाईनें कुठें चालला आहेस ?

मंदाक्ष—गालवा, धौम्यगुरूंनीं मला सांगितलें आहे कीं उद्यां वत्सराजा राक्षसांचा पराभव करण्याकरितां आपल्या तपोवनांत येणार आहे, तर त्याच्या सैन्याची नीट व्यवस्था ठेवावी, असा निरोप तमसावनदेवतेला सांगून ये, ह्मणून मी तिच्याकडे जात आहें.

गालव—मित्रा मंदाक्षा, तो सत्यवचनी, पराक्रमी राजा आल्याबरोबर आपलीं सर्व संकटें दूर होऊन धौम्यगुरूंना रात्रंदिवस लागलेली काळजी नाहींशी होईल.

मंदाक्ष—अरे त्यांना एक का काळजी आहे ? आपल्या आश्रमांत आज बरेच दिवस वास करणारी व धौ-

न्यगुरूंना पोटच्या मुलीसारखी प्राणाहून प्रिय झालेली, अशी ती प्रियदर्शिका–

गालव—खरंच मित्रा मंदाक्षा, मी तुला विचारीन ह्मणून ह्मणत होतों. अरे ही प्रियदर्शिका कोणाची कोण, व ही राजकन्येसारखी दिसत असून हिच्या कपाळीं हा वनवास कां आला? तूं नेहमीं गुरुजींच्या अगदीं निकटसेवेंत असतोस ह्मणूनच तुला विचारावयाचें.

मंदाक्ष—ऐक तर.

पद [‘ नच दृष्टींस पडती ते ’ या चालीवर.]

अंगनृपति दृढवर्मातनुजा हीच असे दर्शिका ॥ स्वरूपें लाजवि जी मेनका ॥ कलिंगराजें हीचे पाणिग्रहणा प्रार्थियलें ॥ परि त्या भूपें नच ऐकिलें ॥ निश्चय त्याचा सुता आपुली द्यावी वत्साला ॥ ऐकुनी कालिंग बहु तापला ॥ या भीतीनें स्वसुता भूपें विंध्यकेतुसदनीं ॥ धाडिली वयस्य प्रिय जाणुनी ॥ वत्सनृपानें तुंबळ समरीं विंध्यकेतु जिंकुनी॥ आणिलें दर्शिकेस हरुनी ॥ परस्परांचें प्रेम वाढलें रूपगुणां मोहुनी ॥ राज्ञी कुपित जाहली मनीं ॥ रक्षकहस्तें रथीं घालुनी धाडिली इजला वनीं ॥ आली याच वनीं निर्जनीं ॥

गालव—हरहर! काय त्या बिचारीवर संकट ओढवलें तरी? पुढें—

मंदाक्ष—पुढें, मी एकदां दूर्वासमिधा आणण्याकरितां तपोवनांत गेलों असतां या बिचारीचा आक्रोश मीं

ऐकिला. ह्मणून जवळ गेलों तेव्हां तिनें अति दीन स्वरानें आपली स्थिति मला सांगितली. त्यावरून मला अति वाईट वाटून मी तिला गुरुजींकडे घेऊन आलों. तेव्हां त्या वत्सराजाची भेट मला पुन्हां लवकर करून द्या, नाहीं तर मी आपले प्राण ठेवणार नाहीं, असा प्रियदर्शिकेचा हट्ट पाहिल्यामुळें गुरुजींना रात्रंदिवस काळजी लागली होती. परंतु—

गावल—परंतु ह्मणजे ?

मंदाक्ष—परंतु, प्रियदर्शिकेच्या दैवानेंच ह्मणावयाचें तो राजा अनायासानें दानवसंहाराकरितां उद्यां तपोवनांत येणार आहे; त्या वेळेस हा चंद्ररोहिणीयोग आयताच जुळून येईल.

गालव—वहावा ! असें होईल तर—

साकी.

सुदैव फळुनी विरहकाल तो सरला राजसुतेचा ॥ सागरमंदाकिनिसंगम हा होइल फार सुखाचा ॥ राजसुतेवरि ती ॥ गुरुची सत्य असे प्रीती ॥ १ ॥

बरें तर मंदाक्षा, मी दर्भसमिधा आणायला जातों. तूं ही आनंदाची बातमी प्रियदर्शिकाताईला जाऊन सांग.

. . . .

प्रवेश २ रा.

(उदासीन झालेली प्रियदर्शिका पत्रलेखेसह पडद्यांतून गात गात येते.)

प्रिय०—

पद—(' माझा भरत दे० ' ह्या चालीवर.)

सखये प्राणसखा मजला ॥ पुनरपि भेटेलना ॥

॥धृ०॥ सरुनी राणीचा संताप ॥ अथवा पूर्वजन्मिचा शाप ॥ देवा हरुनी हा हृत्ताप । माझा व्याप नेशिलना ॥ १ ॥ झाला व्याकुल हा मम जीव । माझा जिवलग तो दावीव ॥ माझी दुबळीची मनिं कींव ॥ भगवंता येइलना ॥ २ ॥

पत्र०—गडे, असा किती तरी आक्रोश करशील? हें बघ, तुझ्या या शोकानें हे तपोवनतरु देखील अश्रु गाळीत आहेत. मग माझी अवस्था काय होत असेल याची तूंच कल्पना कर. ही पहा ऐन दुपारची वेळ आहे. रडून रडून पित्त भडकेल, आणखी भलतीच विकृति मात्र होईल. ह्मणून ह्मणतें, गडे, अंमळ शांत हो! तुझी ही अलीकडची स्थिति पाहून धौम्यबाबांना देखील किती काळजी लागली आहे सांगूं? ते परवां मला असें ह्मणाले,—

प्रिय०—गडे खरंच काग? ते काय ह्मणाले तें लवकर सांग बरं.

पत्र०—ते ह्मणाले कीं, ही रोहिता हरिणी जेव्हां गर्भिणी होती, तेव्हां तिची सुखरूप सुटका केव्हां होते याची मला जेवढी काळजी लागली होती, त्याच्या दुप्पट काळजी प्रियदर्शिकेला वत्सराज पति पुन्हां कसा मिळेल, याविषयीं रात्रंदिवस लागली आहे.

प्रिय०—हे वेड्या हृदया! सुखदुःखाच्या मिश्रित तरंगांनीं कितीतरी मला छळशील?

(**पद** ‘ मना तळमळशी ’ या चालीवर.)

जिवा कां झुरशी ॥ व्यर्थ हिला कां रे छळिशी ॥

करूनि विरहासी ॥ध्रु०॥ दुर्लभ पुरुषा इच्छुनि ऐसा निराश कां मग होशी ॥ १ ॥ फिरूनि अशा या सुखवार्तेनें ॥ धीर कासया धरिसी ॥ २ ॥

पत्र०—गडे, अशी अधीर होऊं नकोस. ब्रह्मदेवानं तुझ्या कपाळीं जर वत्सराजा पति लिहिला असेल तर धौम्यगुरूंच्या कृपेनें तुझे मनोरथ सफळ होतील.

प्रिय०—गडे, या अभागीच्या कपाळीं जर सुख मिळायचं असतं तर असं दुर्दैव कां ओढवतं ?

पद— (' अरसिक किती हा ' या चालीवर.)

हेतु मनींचा फसला ॥ इष्ट मनोरथ भग्नचि झाला ॥ ध्रु० ॥ ऐनचि त्या समयाला । यावी कां ती राणी कुटिला ॥ धाडुनि मजला वनाला ॥ घात तिनें बघ कैसा केला ॥ आशातंतू तुटला ॥ काय करूं मी दुर्दैवाला ॥ माझा जिव हुरहुरला ॥ मी कष्टुनि गेलें वनवासाला ॥ नलगे जिव हा मेला ॥ १ ॥

पत्र०—अग ज्या दैवानं तुला त्या राजाचा एकदां संगम करून दिला, तेंच दैव पुन्हा उभयतांची गांठ घालून देईल. अग, ही वसंतऋतूची शोभा तरी पाहिलीस का?

पद— (' रतिविहार गंगेमाझारीं ' या चालीवर.)

ऋतु वसंत शीतळकारी गे ॥ बघ फुलले तरु हे भारी ॥ कोकिला गाति नरनारी गे ॥ अति मंजुळ पंचम सुरीं ॥ किति मधुर आम्रमंजीरी गे ॥ घमघमाट सुटला भारी ॥ बघ आंबराइ सुखकारी गे ॥

घनगाराचि छाया सारी ।। किति कुसुमतरू मधुधारी गे ।। बघ फुलले आपुल्या दारीं ।। जणु वसंत ऋतुची नारी गे ।। नेसली शालु जरतारी ।। १ ।।

प्रिय०–सखे,

पद– (' बघुनि उपवना ' ह्या चालीवर)

वसंत ऋतु हा जरि रमणिय तरी विपरित माझी स्थिती ।। भडकुनि कामाग्नी व्याकुल हे प्राण गडे होती ।। मत्त कोकिला वसंत आला ऐसा शब्दिं किती ।। दुःखित माझ्या हृदयावरिगे डाग सखे देती ।। चाल ।। हा आम्रमंजरीशर स्मर धरि मजवरी ।। हा मलयसमीरण शूल करी मम शिरीं ।। कोकिळा हि वाटे केवळ वैरिणिपरी ।। चाल ।। या सर्वांच्या भडिमारानें घाबरी मी होतें ।। विरहानलिं या जगण्याहुनि गे मरण बरें वाटतें ।। १ ।।

पत्र०–अगबाई, हिचा हा शोक फारच वाढत चाललासा दिसतो. [उघड] गडे, हें पहा मला एक युक्ति सुचली आहे ती सांगूं का?

प्रिय० —मीं तुला कधीं तरी प्रतिबंध केला आहे का ? मग अशी नवऱ्यासारखी काय विचारतेस ती? आपले देह जरी दोन आहेत तरी जीव एकच आहे. सांग बरं तुला कसं वाटतं?

पत्र०–गडे मला असं वाटतं कीं तूं आपल्या विरहाचे आशयाचा मदनलेख लिहून मजजवळ दे, म्हणजे मी

तो आश्रमांतील ऋषिकुमारांचे हातीं प्रसादाच्या मिषानें राजाकडे पाठवीन.

प्रिय०—आहाग वेडे, ह्मणजे आयतीच चोरांच्या हातांत जामदारखान्याची किल्ली दिल्यासारखं होईल. कारण तो लेख जर दैववशात् राणीच्या हातीं पडला तर मग याहूनही मोठें अरिष्ट आपणावर येईल.

पत्र०—हेंपण खरंच. आतां कसं करूं? गडे एवढाच कायतो माझा उपाय होता.

प्रिय०—

अंजनीगीत.

चिंतामणि जरी मम करिं आला ॥ परि दुर्दैवें हरुनी नेला ॥ काय करिशि तूं सखे तयाला ॥ हीन दैव माझें ॥ १ ॥

पत्र०—सखे, अशी उदासीन होऊं नको. कुलदेवतांच्या आशीर्वादानं सर्व मनोरथ पूर्ण होतील.

(इतक्यांत मंदाक्ष येतो.)

मंदाक्ष—केवढें हें प्रियदर्शिकेचें दैव ह्मणायचें कीं, तो महाक्रमी वत्सराजा उदईक तपोवनांत येणार आहे. ही आनंदाची वार्ता आज गालवानें मला सांगितली. बिचारी प्रियदर्शिका त्या राजाच्या विरहानें कशी झुरणीस लागली आहे! ही पहा प्रियदर्शिका पत्रलेखसह एकांतांत कांहीं बोलत बसली आहे, तर तिला हा वृत्तांत सांगावा.

प्रिय०—बाळा मंदाक्षा, आज इतक्या घाईघाईनें कां आलास?

मंदाक्ष—ताई, उद्यां वत्सराज राक्षसांच्या संहाराक-रितां आपल्या तपोवनांत येणार आहे, ही आनंदाची वार्ता तुला सांगण्यासाठीं घाईघाईनें आलों.

[प्रियदर्शिका आनंदित होऊन एकीकडे उभी राहते.]

पत्र०—मंदाक्षा, ग्रीष्मतापानें मरणोन्मुख झालेली माधवी लता मेघवृष्टीनंतर जशी टवटवीत होते तसा या आनंदवार्तेनें माझ्या मैत्रिणीच्या मनाला किती तरी धीर आला.

प्रिय०—हृदया, एका नांवासारखीं पुष्कळ नांवें असतात, ह्मणून प्रत्यक्ष खात्री करून घेतल्याशिवाय उगीच कां उड्या मारतेस?

मंदाक्ष—पत्रलेखे, खरेंच पहा.

साकी.

पतिसंगम-आशा मनिं उपजुनि आनंदें ही भर-ली॥सौदामिनि मेघाशीं तेवीं कांतोत्सुक ही झाली॥ आला धीर हिला ॥ वाटे सर्व ताप गेला ॥ १ ॥

आतां मी गुरुजींच्या संध्येची तयारी करण्याकरितां जातों.

पत्र०—सखे प्रियदर्शिके, आतां तरी या पत्रलेखेच्या भविष्यावर विश्वास ठेवशीलना? आतां चंद्ररोहिणीयोग लवकरच जुळून येईल बरं.

प्रिय०—गडे, असें बोलून बोलून मला आतां किती

तरी लाजविशील? चल तर बाबा आश्रमांत आपली वाट पहात बसले असतील. केव्हांच्या आपण पुष्पवाटिकेंतच बसलों आहोंत. हा पहा सूर्यनारायण अस्ताचलीं चालला.

पत्र—अग, तो जरी अस्तास जात आहे, तरी याहून निराळाच एक सूर्यनारायण उद्यां या तपोवनांत उगवणार आहे बरं.

प्रिय०—हें काय बाई? जिथे तिथे तुझी मेली आपली थट्टाच सारी! पत्रलेखे, हा चमत्कार पहा. सूर्यास्ताबरोबर या कमलिनीची कशी स्थिति झाली ती; ही देखील बिचारी मजसारखीच तपस्विनी झाली. पहा—.

पद. (' स्फटिकांचे हे पदपथ ' या चालीवर)

दिनिं सुखवूनी निजकांतेला ॥ सहस्ररश्मी अस्ता गेला ॥धृ०॥ संध्यावल्का धरि भृंगतती ॥ रुद्राक्षांची करुनी माला ॥ निजपतिप्राप्तीसाठीं करिते ॥ पहा पद्मिनी उग्र तपाला ॥ दिनिं० ॥

पत्र०—अग, बोलण्याच्या नादांत कितीतरी आपल्याला उशीर झाला? या पहा अंधारानें दिशा व्याप्त होत चालल्या आहेत. म्हणून म्हणतें, लवकर लवकर पावलें टाक.

प्रिय०—अग पण हो! हा कितीतरी काळोख पडला आहे.

पद (' इसतन-धनकी. ' या चालीवर.)

हळुहळु चाल सखे गे जपुनी ॥ अंधारानें न दिसे नयनीं ॥ विखुरली वातें माझी वेणी ॥ पदरहि गेला सारा सुटुनी ॥ हळुहळु० ॥

[जातात.]

प्रवेश ३ रा.

मंदाक्ष–किती तरी आज मला या वत्सराजाच्या पराक्रमामुळें आनंद होत आहे पहा––

पद (शंकराभरण.)

धौम्यगुरु आज बहु पावतिल शांतिला ॥ राक्षसांचा अतां काळ सरला ॥ धृ० ॥ मारुनी संगरीं दुष्ट दानवगणा ॥ वत्सराजा पहा विजयि झाला ॥ देवदेवांगना खालतीं वर्षती ॥ अंबरांतुनि या पुष्पमाला ॥ धौम्य० ॥

अरे हो, पण काय तरी आश्चर्य कीं, वत्सराजाबरोबर राणी वासवदत्ता देखील आली आहे ! ! शर्थ आहे तिच्या मत्सरीस्वभावाची. युद्धाचें ढोंग करून कदाचित् राजा प्रियदर्शिकेच्या शोधासाठीं वनांत जाईल, असा संशय तिला येऊन ती आपली आज राजाबरोबर युद्धांत देखील रथांत बसलेली होती. बिचाऱ्या प्रियदर्शिकेच्या सुखाला ही विघ्नदेवताच आली ह्मणावयाची! पण धौम्यगुरुजी प्रियदर्शिकेचे पूर्ण पाठिराखे असतांना तिचे मनोरथ सफल झालेच पाहिजेत. असो, ही बातमी आतां धौम्य गुरूंना जाऊन सांगूं या.

[जातो.]

(आसनस्थ धौम्य ऋषि प्रवेश करितो.)

धौम्य––[उत्कंठित होऊन.]

पद (आसावरी)

कांहिंच ना कळलें ॥ मजला ॥ धृ० ॥ वत्सराज

वनीं येउनि दानवयुद्ध चालु झालें ॥ परि त्या भूपें नकळे राक्षस समरीं संहारिले ॥ १ ॥ असुरांच्या तापें जपतप हे निरुद्ध कीं झाले ॥ या चिंतेनें निशिदिनिं माझें हृदय कसें पोळे ॥ १ ॥

तर आतां ती समरवार्ता केव्हां कळेल अशी उत्कंठा मला लागली आहे.

गालव—[प्रवेश करून] गुरुजी ! अहो गुरुजी ! असे चिंताक्रांत काय बसलांत ? त्या महाविक्रमशाली वत्सराजाला जय मिळाला ही आनंदाची बातमी तुम्हांला सांगण्याकरितां मी मुद्दाम पळत पळत आलों. पहा—

ओंवी.

जैसा कमलें मत्त वारण ॥ शुंडाग्रें दे नभीं फेकून ॥ तेंवी राक्षसमस्तकें छेदून ॥ वत्सभूपें टाकिलीं ॥ १ ॥

धौम्य—[हर्षानें] वाहवा !

पद (भैरवी.)

काय वदावें मीं या समयीं ॥ चिंता कांहीं उरली नाहीं ॥ मम हृदयींचें शल्यचि मोठें ॥ उपटुनि आज निघालें वाटे ॥ १ ॥

गालव—गुरुजी, वीर्यशाली वत्सराजाच्या धनुष्याचा टणत्कार ऐकल्याबरोबरच राक्षसांनीं पळ काढला. पण त्या राजानें खड्गास्त्र सोडून त्या सर्वांचीं शिरकमळें छेदून टाकिलीं.

धौम्य—बाळा गाळवा, अशा त्या परोपकारी वत्सराजाच्या दर्शनाची उत्कंठा मला फार लागली आहे.

पद-(' पाहिन सिंहासनिं ' या चालीवर.)

बघिन तया मी कधिं राजेंद्रा ॥ उत्सुकता मज भारी ॥ धृ० ॥ वधुनि असुरगण बाहुबलानें ॥ देह तपोवन शांती ॥ नभिं दुंदुभि ही वाजे ज्याची ॥ सुरवर गाती कीर्ती ॥ १ ॥

गालव-गुरुजी तमसा वनदेवतेचा पाहुणचार घेऊन वत्सराजा इकडेच येत असेल.

धौम्य-गालवा, ज्यानें दुष्टांचा संहार करून आपल्या तापसक्रिया निर्विघ्न केल्या त्या राजावर कोणता अनुग्रह करावा या मी चिंतेंत आहें.

गालव—खरेंच गुरुजी, वत्सराजाला आपण कोणता प्रसाद देऊन संतुष्ट करणार ?

धौम्य-अरे, एक सांगतों.

पद— (भैरवी.)

हृदयीं चिंति सदा मी ॥ गालवा ॥ दर्शिकेस पति वत्साचि नामि ॥ धृ० ॥ वत्सराज हा मन्मथ सुंदर ॥ इजला शोभे उचित असा वर ॥ चंद्रोहिणी योग्य जुळे तर ॥ वास करिन मी मग सुखधामीं ॥ गालवा ॥ १ ॥

गालव-गुरुजी, हें कांहीं उघड सांगायला नको. प्रियदर्शिका म्हणजे तुमच्या गळ्यांतला ताईतच. तिला एकदां वत्सराजाच्या स्वाधिन केली म्हणजे आपण निश्चिंत व्हाल.

धौम्य—बरें पण युद्धचमत्कार पाहण्याकरितां मीं मंदाक्षाला पाठविलें होतें तो अजून कां येत नाहीं ?

गालव—गुरुजी, हा पहा मंदाक्ष आलाच (मंदाक्ष येतो).

धौम्य—बाळा मंदाक्षा, तो विजयी वत्सराजा इकडेच येत आहेना ?

मंदाक्ष—गुरुजी, तो वत्सराजा विजयी होऊन विश्रांतीसाठीं राणी वासवदत्तेसह वृक्षछायेखालीं बसला आहे, आणखी लौकरच आपल्या दर्शनासाठीं येईल.

गालव—काय ह्मणतोस ? राणी त्याच्याबरोबर आली आहे ? गुरुजी पाहिलेंत कां ? आतां प्रियदर्शिकाताईची काय वाट होणार ?

धौम्य—मुलांनो तुम्ही अगदीं भिऊं नका. त्याची सर्व कांहीं तजवीज मी करितों. बरें पण वत्सांनों, तो राजा फार श्रमला असेल याकरितां आपण आपल्या वेदशाळेसमोर त्याची वाट पहात बसूं चला !

साकी.

नेत्र भरुनियां कधिं पाहिन मीं अजि त्या शशिकुलदीपा ॥ उत्कंठित मन माझें झालें बघण्या वत्स सुभूपा ॥ राक्षस संहरिले॥ तेणें विघ्न नष्ट झालें ॥१॥

[जातात.]

[राजा, राणी व यौगंधरायण प्रवेश करितात.]

राजा— साकी.

निदाघ सरल्यावरि मेघोदकवृष्टि जशी पांथाला ॥ सुखकर होते तेवीं देई छाया मज शांतीला ॥ सप्तपर्णतरुची । झाली जी बहु सौख्याची ॥ १ ॥

राणी—महाराज, आतां आपण बरीच विश्रांति घेतली आहे. तर ज्या महर्षींच्या कामाकरितां आपण या तपोवनांत आलों त्यांचें पादवंदन करून पवित्र व्हावें अशी माझी फार उत्सुकता आहे.

राजा—देवी वासवदत्ते, दानवांचा रणांत संहार करून आज जो मला विजय मिळाला हा धौम्य महर्षींचा प्रसाद हेंच खचित. त्या पुण्यमूर्तींच्या दर्शनास आतां जाऊं चला. यौगंधरायणा, तूंही ऋषींचा प्रसाद घेण्याकरितां आमच्याबरोबर आश्रमांत चल.

यौगंध०—ठीक आहे. चलावें महाराज.

राणी—महाराज, हें तपोवन केवळ ब्रह्मसुखाचें आगरच आहे. पहा.—

पद.—(' आम्रमंजिरी तुला ' या चालीवर.)

पशुपक्षी हे आनंदानें वास इथे करिती ॥ तरुवर कोमल लतिकांसंगें संतोषें नांदती ॥ ऋषिजन ठायीं ठायीं बसुनी ब्रह्मसुखा सेविती ॥ वाटे सगळीं पापें आपुलीं धुवुनि पहा जाती ॥ १ ॥

राजा—ह्मणूनच याला ब्रह्मारण्य ही यथायोग्य संज्ञा आहे. [एकीकडे] अरे पण हें काय ? माझा उजवा बाहु स्फुरण पावतो याचें काय कारण बरें ? हां! तसें तर नसेलना ? पण छेः ! माझें वेडें मन इष्टवस्तूचें चिंतन करून संशयडोहांत उगीच बुडत आहे. त्यांतूनही येथें राणी बरोबर असल्यामुळें प्रियासंगमाची आशा अगदींच नको. [उघड] वासवदत्ते, हे पहा धौम्य महर्षी वेद-

शाळेसमोर आपली वाट पहात उभे राहिले आहेत. त्यांना अभिवादन करूं या. [तसें करतात.]

धौम्य--वत्सा, दीर्घायु हो. वत्से, पुत्रवती सौभाग्यवती भव.

राजा—[हात जोडून] महाराज.

साकी.

या दासाला श्रेयस्कर जी आपण आज्ञा केली ॥
पौंडरीकमालेपरि ती मीं सादर स्वशिरीं धरिली ॥
राक्षस संहरिले ॥ आतां कांहिं न भय उरलें ॥ १ ॥

यौगंध०--भगवन्, आपल्या चरणांचा दास यौगंध प्रणाम करितो.

धौम्य--वत्सा कल्याण असो. हे विजया वत्सराजा—

पद. (' ब्राह्मणकन्या नव्हे ' या चालीवर)

महाभाग तूं वसुंधरेचा स्वामि खरा शोभसी ॥
यशानें सकल भुवन व्यापिशी ॥ १ ॥ तपोवनांतिल वनदेवी या बघुनि महा तव जया ॥ करिती पुष्पवृष्टि पाहिं या ॥ २ ॥ किन्नरतरुणी तरुपत्रावरि हरिणमदें काढुनी ॥ गाती तव यशगीता वनीं ॥ ३ ॥ नारदवदनें ऐकुनि विजया स्वर्गि महेंद्रहि महा ॥ मोदें डुलत राहिला पहा ॥

राजा —भगवन्, हा सगळा आपल्या चरणांचा प्रभाव

धौम्य—गालवा, आश्रमांत जाऊन प्रियदर्शिकेला सांगावें कीं, मधुपर्काचें साहित्य व पादोदक घेऊन लवकर वेदशाळेंत ये. आज आपल्या घरीं थोर अतिथी आले आहेत.

गालव—जशी गुरुजींची आज्ञा. [जातो.]

राजा—[आपल्याशीं] काय ? हें माझ्या अहोरात्रीं ध्यानापुढें असलेलें नांव कोणाचें असेल बरें ? त्यांतूनही या शुभशकुनांवरून माझा असा तर्क होतो कीं,

पद—(' माध्य नसे मुनिकन्या ') या चालीवर

या मुनिच्याच दयेनें ॥ माझें दुर्दैव जणूं सरलें जाणे ॥ धृ० ॥ मम हृदयाची प्रियकरिणी ती ॥ येथें केशी आश्रमिं येती । काय असे नकळे तें ॥ मन हें उत्कंठेनें उडतें ॥ १ ॥

राणी—(आपल्याशीं) अग बाई ! हें माझ्या कर्णाला वज्रासारखें पीडा देणारें नांव इथें कुठून आलें ? कदाचित् त्या नांवाची या महर्षींची कन्या तर नसेना ?

धौम्य—महाभागा, वेदशाळेंत चलावें. (सर्व जातात.)

[प्रियदर्शिका व पत्रलेखा येतात.]

प्रिय०—

पद-(' सखयांनो दाखवा गे. , ह्या चालीवर.)

जीवलग तो भेटवीं गे ॥ मजसिं सखे या क्षणा ॥ चाल ॥ करूं गडे काय मी तरी ॥ झालें बावरी ॥ मजसि अंतरीं॥ धीर धरवेना॥दाखविं त्या मोहना॥१॥

पत्रलेखे, गालव तर ह्मणतो कीं कालस्वरूपिणी राणीसह तिकडची स्वारी आली आहे, आणि माझा तर बाई आज डावा डोळा लवतो आहे.

पत्र०—गडे, तूं अशी घाबरी होऊं नकोस. तुह्मां उभयतांच्या भेटीची धौम्यबाबांनीं अगोदरच तयारी करून ठेविली असेल.

प्रिय०—पत्रलेखे, जिनें माझ्या सर्वस्वीं सौख्याचा नाश केला, त्या राणीपुढें मी उभी तरी कशी राहूं? (अश्रु गाळते.)

पत्र०—अहाग वेडे! कितीतरी भिशील!! धौम्य-बाबा कीं नाहीं तुझे भक्कम पाठिराखे आहेत. चल तर लवकर, बाबा वेदशाळेंत वाट पहात बसले असतील.

(राजा, धौम्य वगैरे वेदशाळेंत बसले असतां पडदा उ०)

प्रिय०—(पुढें होऊन व राजाकडे न्याहाळून पाहून.)

पद.

याचा वदनशशि माझी मती गुंगवी। मोहुनियां ॥ धृ० ॥ तृषिता चातकीं नवमेघापरी तेविं मला रंजवी ॥ मो० ॥ १ ॥ दीप पतंगा ओढी बलानें तेविं मला गुंगवी ॥ मो० ॥२॥ मम करुणा त्या भगवंताला आली मला सोडवी ॥ करुणा आली० ॥ ३ ॥

पद—('होवे भला' ह्या चालीवर)

हीच खरी मूर्ति तरी ॥ आजवरी मीं अंतरीं ॥ सांठविली ॥ तीच आली॥मजसि तारायाला ॥धृ०॥ रोमांचिता होई तनू ॥ थर थर थर थर थर थर थर थर थर थर ॥ १ ॥ वाटे मना ॥ या मोहना आलिंगना द्यावेंचना॥सुरवरहरिनंदनसम सुंदर हा नाथ २

राजा—(आपल्याशीं) वाहवा, धन्य मी. हीच ती

चारुगात्री.—अरे पण, ही विरहानें अगदीं ओळखूं येत नाहीं! पहा हिची काय अवस्था झाली आहे!

पद—('घनशाम सुंदरा' ह्या चालीवर.)

मूर्तिमती जणुं विरहव्यथा ही दिसते या काळीं॥

मृणालिकेपरि तनुलतिका किती विरहें तरि सुकली॥ स्कंधदेश किति गळोनि गेले पांडुरता आली ॥ उज्ज्वल प्रीती माझे ठायीं लाडकिनें राखिली ॥ हृदयीं सखिच्या कठोर शल्यें मदनाचीं रुतलीं ॥ हंत कसा मी जिवंत आहें पाहुनियां हिस असली ॥ १ ॥

(यौगंधरायण व पत्रलेखा एकमेकांकडे पाहून हसतात).

राणी—[प्रियदर्शिकेला पाहून.]

पद.

मनिं पाहुनि इजसि संताप होत अति ॥ काय करावें कांहीं सुचेना भ्रांत चित्त हें भान नसे मुळिं ॥ धृ० ॥ कशि आली ही या वनिं नकळे । इस आणिलें कुणीं । क्रोध शिरे बहु मन्मनीं ॥ सहन होई न मज होत अनावर ॥ पाहुनि० ॥ १ ॥

[रागानें तोंड फिरविते]

धौम्य—वाहवा ! काय चमत्कार पहा !

पद (' अभिनव मधुलोलुप ,) या चालीवर.)

पद्मिनिपति रवि पुनरपि उदय पावला ॥ म्हणुनि पहा तीस किती हर्ष जाहला ॥ धृ० ॥ तत्सपत्नि भानुमति । द्वेष तिचा करि चित्तीं ॥ पाहुनियां उभयप्रीति ॥ सहन तिला नच होती ॥ म्हणुनि तिनें वदनशशी उलट फिरविला ॥ १ ॥

[आसनावरून उठून वासवदत्तेजवळ जातो.]

वत्से वासवदत्ते, काय हा तुझा वेडेपणा ? प्रियदर्शिकेविषयीं तुझा मत्सरभाव अगदीं वृथा आहे. अग,

वत्सला तूं व प्रियदर्शिका ह्या दोघी कुलपत्नी असाव्यात असा त्या विधात्याचाच मूळ संकल्प. त्याला तूं आड कशी जाणार ? त्यांतून वत्से, ही प्रियदर्शिका कोण हें तरी तूं नीट ओळखलेंस का ? (राणी साशंकमुद्रेनें प्रियदर्शिकेकडे टक लावून पहाते.) अग, तुझी प्रिय माता पद्मावती तिच्याच प्रत्यक्ष भगिनीची कन्या ही प्रियदर्शिका ! तर आपल्या मावसबहिणीवरचा वैरभाव सोडून तिला कडकडून भेट पाहूं.

प्रिय०—अग बाई ! माझी मावशी पद्मावती तिची ही एकून मुलगी तर ! लहानपणापासून मीं हिला न पाहिल्यामुळें आजपर्यंत मी हिला अगदींच परकी समजत होतें.

राणी—हरहर, समजलें ! जिच्याशीं मीं आजपर्यंत वैर धरिलें, ती ही प्रियदर्शिका माझी मावसबहीण असून, ही आमच्या महाराजांनाच मिळावी असा ब्रह्मदेवाचा संकल्पच. तर मीं पापिणीनें हिच्याशीं वैर धरून ब्रह्मदेव, ऋषिजन व माता यांना व्यर्थ शिणविलें. [पुढें होऊन] गडे पियदर्शिके ये ये. मला कडकडून भेट्‌दे. [उभयतां भेटतात.] मीं पापिणीनें तुला आजपर्यंत न ओळखतां व्यर्थ गांजलें, तर आतां सर्व कांहीं मागचें विसर.

पद—(' अजि शेवटचा ' या चालीवर.)

बहु भाग्याचा दिन हा भगिनी अजिचा ।। आपुल्या या भेटीचा ।। अपराधी मी भगिनी तव गे साची ।। करिं मज तूं क्षमा तयाची ।।

प्रिय०—

।। चाल ।। सोडुनियां सकलहि रागा ।। मजवरि

गे करि अनुरागा ॥ चाल ॥ हा दोष असे सगळा या पापिणिचा ॥ भगिनी गे नच कोणाचा ॥ १ ॥

वासवदत्ता ताई सध्यां मला किती तरी आनंद झाला सांगूं

पद. (' मज बोध करी ' या चालीवर.)

मज पावलि ती खचित अतां त्रिपुरसुंदरी ॥ कोप लवहि ठेवूं नको भगिनी अंतरीं ॥ धृ० ॥ स्त्री-स्वभाव जन्मतां असेच मत्सरी ॥ तदनुरूप कोपलीस भगिनि मजवरी ॥ सोडिलेंस जरि तूं मला घोर कंदरीं॥राहुं आतां मिळुनि सुखें राजमंदिरीं ॥१

धौम्य—वाहवा ! या सागरगामिनी यमुना व भागीरथी आपण होऊनच एकमेकींला भेटल्या येणेंकरून मला फार आनंद होतो.

राजा—काय तरी माझ्या या दैवाचा खेळ चालला आहे पहा.

पद. (' सुविहित जाहलें ' या चालीवर.)

सुलभाचि जुळला योग पहा हा ॥ अति सुखद कसा या समयाला ॥ धृ० ॥ बहुत छळुनियां मम दैवानें ॥ आनंदाचा कळसचि केला ॥ १ ॥

धौम्य—हे राजा, तूं माझ्यावर फार मोठा उपकार केला आहेस.तर त्याबद्दल हा प्रसाद आज मी तुला अर्पण करतों.

[प्रियदर्शिकेचा हात घेऊन राजाच्या हातांत घालतो]

पद. (' सुखचित्घन गुण. ' या चालीवर.)

पूर्वप्रेम जिचें तुजवरती त्या या प्रिय मम दुहितेला ॥ मम हस्तें स्वीकारुनि सांप्रत ऋणमुक्त करीं मज भूपाला॥ [नंतर वासवदत्तेचा हात त्याचे हातीं देऊन]

कविकन्या शर्मिष्ठा जैशा भार्या दोन ययाति नृपाला॥त्यापरि या दोघींचा संगम देवो तुजला मंगलमाला॥१॥ [सर्वजण खालीं वांकून अभिवादन करितात.]

राजा—

पद. (' निजरूप हिला ' या चालीवर.)

बहु आनंदें मी स्वीकारीं ॥ बहु० ॥धृ०॥ प्रसाद आपुला अति पावन हा ॥ होय बहुत मज सुखकारी ॥ बहु० ॥

पत्र०—सखे प्रियदर्शिके, आतां तरी मनासारखं झालं का ? आतां या गरीब मैत्रिणीशीं धड बोलशील तरी का?

प्रिय०—पत्रलेखे, अता माझी किती तरी थट्टा करशील ? अग तूं माझी जी थट्टा करतेस त्या तुझं वर्म काढल्यावर मात्र रागाऊं नकोस हो; अग, आम्हाला न कळत चोरटेपणानें ज्यांना तूं आपलेसं करून घेतलंस व ज्यांच्या साहाय्यानें रथमाणसांसुद्धां माझ्याकडे आलीस, तेच हे सेनापति, युद्धाचें खोटं निमित्त करून तुला भेटण्यासाठीं आले आहेत. पटली का खूण ? बागेंत जी माझी थट्टा केली होतीस ती मी अजून विसरलें नाहीं हो! ठीक आहे. मी बाबांना आतां सांगतें बरं !

[प्रियदर्शिका धौम्यऋषीच्या कानांत सांगते व पत्रलेखा लाजून खालीं पहाते]

धौम्य—(हर्षानें) वाहावा ! आजचा हा सर्वच कपिलाषष्ठीचा योग दिसतो. यौगंधरायणा—

पद (' रामराज्या सुमुहूर्ते ' या चालीवर.)

वत्सराजाला साह्य रणिं करोनी ॥ तुष्ट केलें तूं मजासि बहु श्रमोनी ॥ ह्मणुनि अर्पित मीं हीच पत्रलेखा ॥ फार शोभे ही तुजसिं कनकलेखा ॥ १

[असें ह्मणून पत्रलेखेचा हात त्याचे हातांत देतो.]

यौगंध०— साकी.

कल्पतरूसम सकल मनोरथपूरक आपण लोकां॥ भगवन् आपुला प्रभाव साऱ्या विदितचि या भूलोकां प्रसाद हा अपुला । शिरसा मान्य पहा केला १

[असें ह्मणून खालीं वांकून पत्रलेखेचा हात सोडतो.]

धौम्य—[प्रियदर्शिकेस] बाळे, ये आतां मला एकदां आलिंगन दे.

प्रिय०—[दुःखानें]

पद (' मारदियोरे पीयां ' चालीवर.)

फार दिले हो बाबा ॥ फार दिले हो ॥ या पापिणिनें कष्ट तुह्मां फार दिले हो ॥ १ ॥ पाहुं कधीं मी ॥ बाबा ॥ पाहुं कधीं मी ॥ हे पूज्य चरण नयनिं पुन्हा पाहुं कधीं हो ॥ २ ॥ जाउं कशी हो ॥ बाबा ॥ जाउं कशी हो ॥ हा प्रेमपाश तोडुनियां जाउं कशी हो ॥ ३ ॥

धौम्य— पद—(मांड)

जा निज पतिसदनाला ॥ बाळे ॥ धृ० ॥ इंद्र जसा पति शोभे शचिला ॥ ययाति नृप वा शर्मिष्ठेला ॥ १ ॥ दुष्यंत जसा शकुंतलेला ॥ वत्सराज हा तेवीं तुजला ॥ २ ॥

गौम्य व ऋषिकु०—राजा!

पद—(' हो जानत प्रीत ' या चालीवर.)

तो मंगलधाम राम तुज पावो ॥ तो मंगलधाम ॥
हे राजा, सुखभाजा प्रभु तूंतें ॥ संतति संपत देवो ॥
तो० ॥धृ०॥ स्त्रीविरही सुग्रीवसमान तुझा विरहान-
ल जावो ॥ प्रियकर सुंदरी-संगम तुजला फार सु-
खावह होवो ॥ तो मंगल० ॥ १ ॥

धौम्य—राजा, आतां काय तुझी इच्छा आहे?

राजा—आतां एवढेंच असो ह्मणजे झालें.

पद—(' धेनुपयोधा ' या चालीवर.)

नीतिमान नृप असुनि प्रजेला सुखदायक होवो ॥

धौम्य—

सुखदायक होवो ॥

राजा—

विद्यालक्ष्मी यांनिं भरतभूदैन्य दूर जावो ॥

धौम्य—

दैन्य दूर जावो ॥

राजा—

सज्जनसंगम सदा घडोनी दुरित लया पावो ॥

धौम्य—

दुरित लया पावो ॥

राजा—

अनंतसुतकविकृति या जगतीं प्रिय सकलां होवो ॥१॥

धौम्य—

प्रिय सकलां होवो ॥

(पडदा पडतो.)

॥ कोरस ॥

(' जलसा कुच हासीका दिल, या चालीवर.)

भो वंदन तव पायां. यदुराया, जितमाया, कमलानिलया ॥ नवघनकाया॥ तारिं आह्मांया, भवसिंधूपासुनि वाया ॥ धृ० ॥ हे कंसशमन, धृतवंशवदन, अवतंसधरण, यदुवंशभरण, मुनिहंसशरण, विध्वंसकरी भवतापा या ॥ भो वंदन तव० ॥ १ ॥ नवकुंजरमण, सुरपुंजशरण, अतिमंजुहसन, श्रितमंजुलवन, अलिगुंजनयुत मधुवंजुलकुंजीं कृताशय्या ॥ भो वंदन० ॥ २ ॥ हे इंदुवदन, अरविंदनयन, नवकुंदरदन अतिमंदहसन ॥ सुपुलिंदरमण, व्रजवृंदावनगोपीराया ॥ भो वंदन० ॥ ३ ॥ श्रीकांत, असासि तूं क्षांत, हरुनि मम ध्वांत, करी शांतांत, बघुं नको अंत, अतां कवि दत्तात्रय निजपदिं न्याया ॥ भो वंदन०॥ ४ ॥

(' हांवे भला क्युं कर ' ह्या चालीवर.)

॥ गौरी हरा । श्रीशंकरा । शेषधरा । चंडीश्वरा॥ या पामरा । दे आसरा । चरणिं दत्तात्रया ॥ गाऊंसदा । शंभुपदा । हर हर हर हर हर हर हर हर हर हर ॥ १ ॥

समाप्त.